

# साम्ययोगाच्या मार्गावर

## दादा धर्माधिकारी

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
स. नं.
REFBK-0008200

ग्राम-सेवा-मंडळ, प्रकाशन

# सा म्य यो गा च्या

# मा र्गा व र

१००८८
१०९३
२८।९९
८२००
REFBK-0008200

आचार्य दादा धर्माधिकारी

(कार्यकर्त्यांपुढें दिलेलें एक भाषण)

प्रकाशक :
मोहनलाल छाजेड,
मंत्री
ग्रामसेवा मंडळ, नालवाडी
गोपुरी, वर्धा (म. प्र.)

किंमत ४ आणे

मुद्रक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक)
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २

१९०४६
ग्रं. नि.
१०९३
२०११७।५
... ग्रंथालय

# दोन शब्द

दादांनीं, गेल्या दोन वर्षांत भूदानाचा संदेश साऱ्या देशांत पोंचवला आहे. त्यांच्या विचारांचा एक लहानसा संग्रह 'क्रांतीचें पुढचें पाऊल' या नांवानें प्रकाशित झाला आहे. त्याचाच हा दुसरा भाग 'साम्ययोगाच्या मार्गावर' या नांवानें पाठकांसमोर ठेवण्यांत येत आहे.

आम्हांला जीवनांत कांहींतरी सुधारणा नको. आम्हांला संपूर्ण जीवन-परिवर्तन हवें आहे. समाजाचें आजचें रूपच बदलून टाकायचें आहे.

इतकेंच नव्हे तर हा बदल स्वेच्छेनें घडून यावा, म्हणजे लादला जाऊं नये, अशी आमची अपेक्षा आहे.

एक पुराणवादी, दुसरे स्थितिस्थापक, तिसरे सुधारक, चौथे क्रांतिकारी आणि पांचवे संक्रांति हवी असणारे असे पांच प्रकारचे लोक आहेत. संक्रांति म्हणजे अशी सम्यक क्रांति, कीं जी संपूर्ण व चांगल्या साधनांनीं घडून येते. हा आजवरच्या सामाजिक अनुभवांचा अंतिम निष्कर्ष आहे.

लोक म्हणतात, 'आहे तर चांगलें, पण हें केव्हां होणार?' फक्त काळाचा प्रश्न आहे. पण काळ वाट पाहूं शकत नाहीं. शिवाय हें विज्ञानाचें युग असल्यानें त्याची गति अधिक जलद आहे. मी म्हणतों कीं हें विज्ञानाचें युग आहे हीच आमची आशा आहे आणि हाच आमचा आधार आहे. विज्ञान लवकरांत लवकर परिवर्तन घडवून आणील. जर त्यासोबत अहिंसा जोडून दिली तर त्यामुळें पृथ्वीवर स्वर्ग निर्माण होईल; आणि जर हिंसेशीं त्याची सांगड घातली तर तो मानव व मानवता या दोहोंचें उन्मूलन करून टाकील.

जर हें विज्ञानाचें युग नसतें तर केवळ मागितल्यानें ३२ लाख एकर जमीन मिळाली नसती. विज्ञानाच्या युगांत जें कांहीं होतें तें त्वरित व महत् परिमाणांत होतें. आत्मज्ञानाबरोबर जेव्हां विज्ञानाचा लाभ घेतला जातो तेव्हां त्यांतून सामूहिक अहिंसा लवकर प्रगट होते, आणि अल्पतम काळांत त्यामुळें क्रांति घडून येते. आपण या क्रांतीचें साधन बनावें अशी ईश्वराची इच्छा दिसते.

मरिदानी गया
२६-४-५४.

**— विनोबा**

# क्रांतीचें पुढचें पाऊल

९०४६ दां क्र ९०९ १९११

## बुद्धि हा मनुष्याचा विशेष

आज सगळीकडे विचार करण्याच्या संकटांतून वांचण्याचा प्रयत्न चालूं आहे. माणूस काम करण्याचें तर टाळीतच आहे पण स्वतः विचार करण्याच्या जबाबदारींतून मुक्त होण्याचा त्याचा अधिक प्रयत्न सुरू आहे. त्याला तयार विचार हवे आहेत. ईश्वरानें माणसाला बुद्धि दिली आहे. पण हाच ईश्वराचा फार मोठा अपराध असें तो मानीत आहे, म्हणून तो ईश्वरावर नाराज आहे. कारण आपण जर पशु-पक्ष्यां-सारखे असतों तर अधिक सुखी झालों असतों असें त्याला वाटतें. परन्तु मनुष्य आणि पशूंत मुख्य फरक असा आहे; कीं मनुष्याला बुद्धि आहे, विचारशक्ति आहे. आणि हेंच माणसाचें वैशिष्ट्य आहे व हीच त्याची ओळख आहे. माणसाची ह्याविरुद्ध तक्रार आहे. तो म्हणतो, 'मी काय देवाजवळ बुद्धि मागायला गेलों होतों! ईश्वरानें न मागतांच मला बुद्धि दिली आहे. त्याचा विरोध म्हणून मी आपली बुद्धि न वापरण्याचा निश्चयच काय तो करूं शकतों.' आमच्या आजच्या परिस्थितीचें थोडक्यांत हें असें चित्र आहे. माणसाचा पैशावर विश्वास आहे, हत्यारां-वर विश्वास आहे, अन्य सर्व वस्तूंवर विश्वास आहे; फक्त आपल्या बुद्धीवर—जिला वैज्ञानिक त्याचें वैशिष्ट्य मानतात—त्याचा विश्वास नाहीं.

## बुद्धिदान द्या

म्हणूनच मी आज आपल्याला बुद्धि दान मागायला आलों आहें. बुद्धि-दान म्हणजे विचारांत मदत. आपण आपल्या बुद्धीचा उपयोग करण्यास सुरुवात करावी, भूदानाचा विचार करावा हेंच खरें बुद्धि-दान आहे. एखाद्या वकिलानें भूदानाचा एखादा मुकदमा मोफत चालविला तर त्यालाहि आम्ही बुद्धि-दान म्हणतों. एखाद्या डॉक्टरनें

भूदान-कार्यकर्त्यांना फुकट औषध दिलें तर तें सुद्धां बुद्धि-दान म्हटलें जातें. वस्तुतः हें बुद्धि-दान नव्हे. हे लोक आमच्यासाठीं थोडीशी मेहनत अवश्य करीत आहेत, म्हणून फार झालें तर ह्याला विशिष्ट श्रम-दान म्हणतां येईल. पण क्रांतीच्या दृष्टीनें अशा बुद्धि-दानाला आणि श्रम-दानाला कांहींच मूल्य नाहीं. बुद्धिमान मनुष्य भूदानाचा विचार समजून घेईल आणि समजावून सांगेल तर तें वास्तविक बुद्धि-दान होईल. म्हणून आपण जर भूदानाविषयीं स्वतःच विचार करण्यास सुरुवात कराल आणि मला विचार करण्यांत मदत द्याल, तर निदान मी तरी आपणाला बुद्धि-दानाची पावती लिहून देईन.

## ईश्वराची अनुपम करुणा

आमच्या जीवनाचें एक संपूर्ण चित्र, ईश्वरानें आमच्या समोर ठेवलें नाहीं ही त्याची अपूर्व कृपा आहे. अंकगणिताच्या पुस्तकांतल्याप्रमाणें सर्व प्रश्न आणि त्यांचीं उत्तरें आमच्या ललाट-रेषेवरहि लिहून ठेवलेलीं दिसत नाहींत. म्हणूनच ईश्वरानें आपल्याला बुद्धि दिली आहे. कांहीं प्रश्न प्रत्यक्ष आपल्यासमोर येतात. कांहीं प्रश्न शोधावे लागतात. प्रचलित परिस्थितीचा विचार करून कांहीं प्रश्नांचें अचूक अनुमान करावें लागतें, व त्यांचीं उत्तरेंहि शोधावीं लागतात. म्हणूनच जीवनांत लज्जत आहे, पुरुषार्थ आहे आणि शौर्य आहे. शिंप्याकडे जसा तयार पोषाख मिळतो तसें जीवन ईश्वरानें आपल्याला दिलें नाहीं, ही त्याची अनुपम करुणा आहे. सर्व प्रश्न कोणताहि एक माणूस सोडवूं शकत नाहीं. विनोबा केवढेहि मोठे असेनात सगळे प्रश्न ते सोडवूं शकणार नाहींत. पुष्कळसे प्रश्न आम्हां तुम्हांला सोडवावे लागणार आहेत.

## मूलगामी विचाराची आवश्यकता

हे प्रश्न सोडवितांना आपली कोणती भूमिका असली पाहिजे ह्याचें स्पष्टीकरण मी ह्या भाषणांत करणार आहें. प्रश्नांचा मूलगामी विचार

होणें ही पहिली आवश्यकता आहे. मूलग्राही विचारासाठीं बौद्धिकतेची गरज आहे. शुद्ध बुद्धिनिष्ठ भूमिकेचें एक उदाहरण आपल्या समोर ठेवतों. शांकर-भाष्यांतील प्रसंग आहे. आद्य शंकराचार्यांच्या बरोबरीचा बुद्धिनिष्ठ दार्शनिक साऱ्या जगांत कोणी झाला नाहीं असें मला वाटतें. खालील उदाहरण त्यांच्या शुद्ध बुद्धिनिष्ठेचें द्योतक आहे.

## ' शास्त्राचा बडगा चालूं देणार नाहीं '

रोज संध्या करा, असा आदेश द्विजांना आपल्या शास्त्रग्रंथांतून दिला आहे. त्याचबरोबर संध्या न कराल तर पाप लागेल अशी टिपणीहि जोडली आहे. कराल तर पुण्य मात्र लागणार नाहीं, न केल्यास मात्र पाप लागेल. शंकराचार्य म्हणाले : ' ही शुद्ध अधिकता आहे. हा शास्त्राचा आमच्या शिरावरील बडगा आहे. आम्ही असली जबरदस्ती चालूं देणार नाहीं. फक्त आपला आदेश आहे म्हणून आम्ही नित्यकर्म करणार नाहीं. ' तेव्हां नित्यकर्मानें जुनें संचित पाप क्षीण होतें असें शास्त्राला कबूल करावें लागलें. आमच्या नित्यकर्माचें कांहीं संकल्प फार अर्थपूर्ण आहेत. संध्येचा एक संकल्प आहे ' ममोपात्त दुरितः क्षयद्वारा श्रीपरमेश्वर-प्रीत्यर्थं अमुकं कर्म करिष्ये ' अर्थात् माझ्या जीवनांत जो पापाचा संग्रह झाला आहे तो क्षीण करण्यासाठीं आणि ह्या क्रियेद्वारां ईश्वराला प्रसन्न करण्यासाठीं मी हें कर्म करीत आहें.

## सामाजिक नीतीचें मूलतत्त्व

समाजांतहि हाच न्याय प्रचलित असल्याचें आपल्याला दिसतें. जो आपलें कर्तव्य करतो, समाज नियमांचे आणि कायद्यांचें पालन करतो, त्याला कोणतेंहि पारितोषिक अथवा प्रतिफल मिळत नाहीं. पण जो समाजाच्या नियमांचा अथवा कायद्यांचा भंग करतो त्याला दंड किंवा शिक्षा होते. कर्तव्यासाठीं पारितोषिक नाहीं पण गुन्ह्यांसाठीं शिक्षा हें सामाजिक नीतीचें मूलतत्त्व आहे. भगवान् शंकराचार्यांनीं धार्मिक

विधानावर जो आक्षेप घेतला तोच ह्या सामाजिक नीतीलाहि लागू आहे.

## ' पुण्यात्मक पाप '

याचें दोन तऱ्हेनें उत्तर देतां येईल. प्रथम हें पाहिलें पाहिजे कीं जें कांहीं आपल्याला हवें तें या मार्गानें मिळूं शकतें काय ? आणि दुसरा विचार हा केला पाहिजे कीं आजपर्यंत समाजांत जाणतां, अजाणतां आमच्या हातून जे गुन्हे किंवा ज्या चुका झाल्या आहेत त्यांचें निवारण या मार्गानें होऊं शकतें काय? जर या दोन्ही प्रश्नांचें उत्तर आपल्याला होकारार्थी मिळालें तरच तें कर्तव्याचें विधान आणि ती सामाजिक नीति आपण मान्य केली पाहिजे, अन्यथा नाहीं. नित्यकर्मामुळें आपणांत फक्त परंपरेनुसार दृढ झालेले जे दोष आहेत त्यांचें निराकरण होतें. त्यामुळें — नवें — पुण्य निर्माण होत नाहीं. पुण्यलाभासाठीं केलेल्या कर्मामुळें माणसाची चित्त-शुद्धि होत नाहीं; त्याच्या व्यक्तित्वाचाहि विकास होत नाहीं. म्हणून लोभमूलक असल्यानें तें पुण्य-कर्म देखील वास्तविक पापच असतें. ज्ञानेश्वर महाराजांनीं तर अगदीं स्पष्ट शब्दांत त्याला " पुण्यात्मक पाप " म्हटलें आहे. या पुण्यात्मक पापानें स्वर्ग मिळतो असें ते म्हणतात.

## निरपेक्ष सेवा लोक-शुद्धीचें साधन

वेदांताहि असल्या पुण्य—कर्माला पाप म्हटलें आहे. कारण त्यामुळें जें फल प्राप्त होतें तें क्षणिक व अस्थायी असतें. जेव्हां आमच्या वैयक्तिक गुणांचें किंवा शक्तीचें रूपांतर सामाजिक मूल्यांत होतें, तेव्हां तें निरपवाद पुण्य कर्म होतें. सामान्य बोलाचालीच्या भाषेंत आपण असेंहि म्हणूं शकतां कीं ज्या कामामुळें मनुष्य एकमेकांजवळ येतो तें पुण्य व दूर जातो तें पाप. त्याचप्रमाणें आपल्या वैयक्तिक लाभाच्या प्रेरणेनें आपल्या स्वतःच्या फायद्यासाठीं जें सामाजिक कार्य आपण करतों

त्यामुळेंहि आपल्या व्यक्तित्वाचा विकास होत नाहीं. अशा कर्माला कोणतेंहि सामाजिक मूल्य नसतें. मनुष्य जेव्हां आपलें सामाजिक कर्तव्य पूर्ण करतो तेव्हां त्यामुळें समाजगत दोषांचें निराकरण होतें. व्यक्तींसाठीं निरपेक्ष सेवा हीच लोक-शुद्धीची साधना आहे. व्यक्तिगत लाभाची प्रेरणा जितकी कमी असेल तितकेंच आमचें सामाजिक कर्म, पुण्यकर्म अथवा सत्कर्म म्हटलें जाईल. भूदान-यज्ञ-आन्दोलनांत, आमच्या व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाच्या ह्या दोन्ही आदर्शांच्या दिशेनें आमचें निश्चितपणें पाऊल पडतें. म्हणूनच मी म्हणतों कीं जें आमचें इष्ट आहे तें जर ह्या आन्दोलनानें सिद्ध होत असेल तर आपल्याला आपली सर्व शक्ति त्यांत लावली पाहिजे. जोंवर ही गोष्ट आपल्या गळीं उतरणार नाहीं तोंवर आपलें काम म्हणजे फक्त बिगार ठरेल. त्यांत उत्कटता आणि लगन निर्माण होणार नाहीं.

## कामांत गोडी कशी निर्माण होईल

'तुला काय हवें आहे?' असें जर आपण माणसाला विचाराल तर मला निरंतर सुख पाहिजे असें उत्तर तो देईल. मग आपण जर त्याला सुख मिळण्याचा व दुःखापासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवूं शकाल तरच आपल्या आन्दोलनांत त्याला गोडी वाटेल, अन्यथा नाहीं. कारण ज्या आन्दोलनाचा जनतेच्या जीवनसमस्येशीं संबंध नसतो, त्या आन्दोलनाविषयीं जनतेला आकर्षण नसतें. एखाद्या बापानें जर आपल्या धाकट्या मुलाला, 'मी कामांत आहें, थोडा गोंद तयार करून दे' असें म्हटलें तर मुलगा म्हणेल 'मला हें सारें कसें करतां येईल? मला तर गोंद तयारच करतां येत नाहीं.' परंतु जर त्या मुलाचा मित्र येऊन, 'चल, आपण पतंग बनवूं' असें म्हणाला तर तोच मुलगा एकतर कुठून तरी गोंद शोधून आणील किंवा गोंद बनविणें शिकून घेईल. म्हणजे त्याला पतंग उडविण्याचें आकर्षण आहे म्हणूनच गोंद तयार करायला शिकण्याचेंहि आकर्षण आहे. मनुष्याला जें पाहिजे त्या

विषयाचें ज्ञान जर दिलें नाहीं तर त्याला उत्कटतेचीं इंजेक्शनें द्यावीं लागतील. पण त्याला जें हवें आहे तें सिद्ध करण्याचा उपाय जेव्हां आपण सुचवाल तेव्हांच त्याच्या बुद्धीला चालना मिळेल, व त्याची बुद्धि नवीन विचार करण्यास प्रवृत्त होईल. आपल्याला जें सामाजिक परिवर्तन घडवून आणावयाचें आहे तें या आन्दोलनानें होऊं शकतें अशी आमच्या कार्यकर्त्यांची जर खात्री झाली तर या आन्दोलनाच्या सफलतेसाठीं अनन्त उपायांचा शोध तो करूं शकेल.

## आमचें ‘ इष्ट ’ व आमचा ‘ संकल्प ’

अखेर आम्हांला काय हवें आहे ? या जगांत माणूस माणसाबरोबर जगावा, माणसाचा नाश होऊं नये, अशी स्थिति आम्हांला पाहिजे. मनुष्य जगावा असा आमचा संकल्प आहे. मनुष्य मरूं नये असा आमचा प्रयत्न आहे. माणसाला मारूं नये असें आम्हांला वाटतें. कारण जो जीव निर्माण करूं शकत नाहीं त्याला कुणाचा जीव घेण्याचा काय अधिकार आहे ? या संबंधांत कांहीं लोक ईश्वराचें उदाहरण देऊन म्हणतात, ‘ तो तर परम दयाळू आहे आणि तरीहि तो जीवांचे प्राण हरण करतो. ’ हा दृष्टान्त विषम आहे. मनुष्य या बाबतींत ईश्वराची बरोबरी करूं शकत नाहीं याचा आम्हांला विसर पडतो. कारण ईश्वर प्राण निर्माण करूं शकतो, म्हणूनच तो प्राणांचें हरणहि करतो. जो जीव देऊं शकतो तो जीव घेऊंहि शकतो. इथें जीव देणें म्हणजे स्वतःचा जीव देणें असा अर्थ नाहीं. दुसऱ्यांत प्राण निर्माण करणें असा अर्थ अभिप्रेत आहे. भगवन्तांनीं ज्याला मारलें त्याला दिव्य स्वरूप प्राप्त झाल्याचें आपण जुन्या ग्रंथांत वाचलें आहे.

## आमचा सांस्कृतिक प्रश्न

आज या विषयीं कुणाचाहि मतभेद नाहीं. आम्हांला लढाई नको असें सारेंच म्हणतात. या जगांत कधींच युद्ध होऊं नये असेंच सर्वांचें

म्हणणें आहे. आम्हांला माणसाची हत्या करायची आहे असें कुणीच म्हणत नाहीं. पण काय करावें! दुसरा कांहीं इलाजच नाहीं म्हणून निरुपाय होऊन आम्हांला माणसाची हत्या करावी लागते; असें मात्र म्हणतात. इसापाच्या गोष्टींतील मेंढराला खाणाऱ्या लांडग्यानें, मी तुला खाऊं इच्छितों असें केव्हांच म्हटलें नाहीं. अनेक खरीं खोटीं कारणें सांगून, मी काय करूं, दुसरा उपाय नाहीं म्हणून मला तुला खावें लागतें असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. कारण हत्येसाठीं कोणत्या ना कोणत्या निमित्ताची अथवा समर्थनाची जरूर असते. म्हणूनच आम्ही माणसाचा वध करूं इच्छित नाहीं असें सारे जण म्हणतात. मग प्रश्न उरतो कीं माणसाला मारल्यावांचून आपल्याला आपले प्रश्न सोडवितां येतील काय? आपल्याला अशा प्रक्रियेचा शोध करायचा आहे, कारण ती आमची सांस्कृतिक समस्या आहे. आपल्याला समस्या तर सोडवावयाची आहे व माणसाचा जीव वांचवावयाचा आहे.

## पक्ष-विरहित विचार—भूदान

आतां भूदान-यज्ञ-आन्दोलनाचा विचार हा एक पक्षविरहित विचार आहे असें आपण सहज मानूं शकाल, त्याचा कोणत्याहि वादाशीं संबंध नाहीं. आम्हांला कोणत्याहि वादाशीं कर्तव्य नाहीं. आम्हांला वादाच्या मोजमापाचा माणूस बनवावयाचा नाहीं, सर्व वादांना माणसांच्या मोज-मापाचे बनविण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. एखादा माणूस कंटाळून टोपीच्या मापाचें डोकें करतो असें म्हणेल तर आपण त्याला काय म्हणाल? आमची बुद्धि आणि वृत्ति संप्रदायाच्या मापाची असतां कामा नये. 'माणूस दगावला तरी हरकत नाहीं, पण वादाची स्थापना झालीच पाहिजे' असें वाद म्हणतो. असेंच साऱ्या धर्मवाद्यांनीं आजवर केलें आहे. कुराण-वादी म्हणाला, 'एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तलवार.' वेद-वादी म्हणाला, 'पुढें चार वेद चालतील व त्यामागें सुसज्जित धनुष्य.' ग्रंथ-वादी म्हणाला, 'दोन्ही हातांत ग्रंथसाहेब ठेवूं

पण कमरेला तीक्ष्ण कृपाण ठेवूं.' बायबल-वादी म्हणाला, 'शरिरावर बायबल व क्रॉस धारण करीन परंतु खांद्यावर बंदूक ठेवीन. मंदिरांत प्रार्थना करीन पण धर्म-युद्धासाठीं बारुद नेहमीं कोरडी ठेवीन.' आपण थोडा विचार करा ज्याचा आश्रय घेतला जातो तो श्रेष्ठ कीं आश्रय घेणारा श्रेष्ठ? शरणागत कनिष्ठ असून शरण्य श्रेष्ठ हें उघड आहे. ज्याचा आश्रय घेतला जातो त्याची इभ्रत वाढते. धर्मानें जर तलवारीचा आश्रय घेतला तर तलवारीची प्रतिष्ठा वाढेल, थैलीचा आश्रय घेतला तर थैलीची किंमत वाढेल.

## शस्त्र-सत्ता आणि धन-सत्ता यांचा अन्त

पुराणांतील हिरण्याक्षाच्या कथेंत याचा संकेत आहे. हिरण्याक्ष पृथ्वीला घेऊन अनन्त शून्यांत बुडून गेला. हिरण्याक्ष म्हणजे ज्याचा सोन्याचा डोळा आहे तो. तो साऱ्या जगाला रसातळाला घेऊन जातो. पुराणांत त्याला असुर म्हणतात. असुर म्हणजे एखादी अलग जीव-योनि नव्हे. देव आणि असुर हे मावस-भाऊ आहेत. असुरांच्या कुशींतून भक्त जन्माला आले आणि भक्तांच्या कुशींतून असुर निर्माण झाले. हिरण्याक्षाच्या कथेचें सार असें आहे कीं आमचें तत्त्वज्ञान आणि धर्म जर शस्त्र अथवा थैलीचा आश्रय घेतील, तर ते रसातळाला जातील. म्हणूनच जगांतील सर्व क्रांतिकारकांनीं धन-सत्ता व शस्त्र-सत्ता यांचा अन्त करण्याचें ध्येय आपल्यासमोर ठेविलें आहे.

## कम्युनिस्ट पार्टीच्या तीन प्रतिज्ञा

उदाहरणादाखल साम्यवादी पक्षाचा आपण विचार करूं. मॉस्कोमध्यें १९१९ सालीं तिसऱ्या कम्युनिस्ट—इंटरनॅशनलची परिषद झाली. त्यांत त्यांनीं तीन उद्दिष्टें आपल्या समोर ठेवलीं. भांडवलवादाच्या सत्तेचा अंत करणें ही त्यांची पहिली प्रतिज्ञा; राज्यांच्या सीमा पुसून टाकणें ही त्यांची दुसरी प्रतिज्ञा; आणि साऱ्या जगांत युद्ध असंभव करूं ही

त्यांची तिसरी प्रतिज्ञा होती. त्यांच्या आणि आमच्या प्रतिज्ञा एक-सारख्याच आहेत. पण प्रतिज्ञेबरोबर पथ्यहि पाळलें पाहिजे इतकेंच आमचें म्हणणें आहे. आम्ही मनुष्याची प्राणहानि होऊं देणार नाहीं अशी आणखी एका प्रतिज्ञेची ह्याला जोड दिली पाहिजे.

## फिदा झालेले व घाबरलेले—

यावरून हें स्पष्ट होईल कीं आमचा संघर्ष कोणा एका वादाशीं किंवा संप्रदायाशीं नसून, सगळ्या वादांशीं व सगळ्या संप्रदायांशीं आहे. आज सर्वांना वादाच्या दृष्टींतून विचार करण्याची संवय जडली आहे. ती संवय सोडणें त्यांना अशक्यप्राय वाटतें. कोणत्याहि प्रश्नाचा विचार करण्याची पाळी आली कीं त्यांचा पहिला प्रश्न—ही व्यवस्था कम्यु-निझमच्या विरुद्ध आहे कीं तर्फेची हा असतो. कांहीं लोक कम्युनिझमवर बेहद खुष आहेत, इतके खुष आहेत कीं त्यांचें डोकेंच ताळ्यावर नाहीं. डोळे उघडून कधीं कम्युनिझमचें रूपहि बघत नाहींत. दुसरे कांहीं लोक कम्युनिझमला भयंकर घाबरले आहेत. घाबरलेले लोक देखील बहुधा डोकें ताळ्यावर ठेवूं शकत नाहींत त्यामुळें हे घाबरलेले लोकहि कम्यु-निझमचें स्वरूप डोळे उघडे ठेवून बघत नाहींत. जे फिदा झाले आहेत ते कम्युनिझमला गुलबकावलीचें फूल किंवा मांत्रिकाचा ताईत समजतात, तर घाबरलेले भयानक वस्तु किंवा भूत मानतात.

## मोठा कोण ? वाद कीं मनुष्य ?

हें निराग्रह, निर्विकार बुद्धीचें लक्षण नव्हे. अशा तऱ्हेच्या संमोह-ग्रस्त व भयविव्हळ वृत्तिमुळें मनुष्याचें लक्ष वास्तविक प्रश्नावरून उडून जातें व त्याच्यासाठीं विशिष्ट वादच एक प्रश्न बनून जातो. मनुष्य त्यांच्या डोळ्यांआड होतो. वादावर त्याचें सारें लक्ष केन्द्रित होतें. म्हणून आपल्याला अशी प्रतिज्ञा करावी लागेल कीं, आम्ही कोणत्याहि वादाचें समर्थन किंवा विरोध करणें हें आपलें कर्तव्य

मानणार नाहीं. आम्हांला आमची बुद्धि प्रश्न सोडविण्याचे कामीं लावली पाहिजे. वादांचें उत्तर देण्यांत नाहीं. अशी प्रतिज्ञा आम्हीं केली नाहीं तर मनुष्यापेक्षां वाद मोठा होईल, मानव समाजापेक्षां संप्रदाय मोठा होईल, देवापेक्षां देवघर मोठें होईल. काय हेंच आमच्या क्रान्तीचें साध्य आहे !

## लढाईच्या मनोवृत्तीचा परिणाम

आमच्याप्रमाणेंच साम्यवादीहि हातोड्या-कोयत्याचें राज्य आम्हांला हवें आहे असें म्हणतात, पण आश्रय घेतात तलवारीचा; हातोडा आणि कोयत्याच्या पूजेचा संकल्प करतात पण तलवारीची प्राणप्रतिष्ठा करतात. तलवारीच्या सफलतेसाठीं मनोवृत्तिहि युद्धाचीच पाहिजे, आणि संयोजनहि युद्धाचेंच पाहिजे. जोंवर लढाईची धुन सवार होत नाहीं, तोंवर लढाईंतील यशहि निश्चित होत नाहीं. जे लढाई करायला सिद्ध होतात ते प्रत्येक प्रसंगाला आणि प्रत्येक अवजाराला लढाईचें साधन बनवून टाकतात. यालाच युद्धाची मनोवृत्ति असें म्हणतात. ज्याला लढायचें असतें त्याला हत्याराची वाण पडत नाहीं. विद्यार्थ्यांत लढाई झाली तर ते पुस्तकें आणि दौती एकमेकांना फेकून मारतील. पुजारी लढायला लागले तर एकमेकांला शालिग्रामहि फेकून मारतील. हलधर बलरामाचा नांगर युद्धाचें हत्यार बनलें. रथांगपाणी श्रीकृष्णाच्या हातीं रथाचें चाकच शस्त्र बनलें. युद्धाच्या मनोवृत्तीच्या अवस्थेंत उत्पादनाचीं अवजारें, संस्कृति, साहित्य व कलेची सारीं उपकरणें सुद्धां युद्धाचीं शस्त्रास्त्रें बनतात.

## रक्षणाच्या भावनेचा परिपाक

युद्धासाठीं जें संघटन आज केलें जातें, त्याच्या मागें संरक्षणाची किंवा प्रतिकाराची भावना असते आणि तिच्या मुळाशीं भय असतें; युद्धासाठीं जें संयोजन चालतें त्याला नेहमीं संरक्षणासाठीं संयोजन असें

१०७२८ ११.१०. ०९७ २६७

म्हटलें जातें. संरक्षण कुणापासून? अर्थात् माणसापासून. ज्याच्यापासून आपल्याला संरक्षण हवें असतें त्याच्याविषयीं आपल्या हृदयांत प्रेम राहूं शकेल? मनुष्य मनुष्यापासून जेथें रक्षण इच्छितो तेथें तो त्याच्यावर प्रेम कसें करूं शकणार? आणि मनुष्य जगूं तरी कसा शकणार? ज्या जगांत माणसाचा माणसावर विश्वास नाहीं, इतकेंच नव्हे तर माणसाला माणसाची भीति वाटते, त्या जगांत मानवतेचा विकास तरी कसा होईल? आम्ही ज्याच्यापासून बचाव करूं इच्छितों त्याच्यापासून साहजिकच अलग राहतों, आणि अलग पडतों. रक्षणाच्या भावनेनें माणसाची माणसापासून ताटातूट होते. म्हणूनच विज्ञानाचा संहारासाठीं उपयोग केला जातो.

## वाद, संप्रदाय व धर्म यांचे सिकंजे

आम्हांला उत्पादक परिश्रमाची प्रतिष्ठा स्थापन करावयाची आहे असें क्रांतिकारकानें म्हटलें आणि त्याला अनुसरून त्यानें आपल्या झेंड्यावर हातोड्याकोयत्याचें चिन्ह ठेवलें, परंतु हातोडा आणि कोयता तलवारीचा गुलाम बनला. त्यामुळें जो हातोडा उत्पादनाचें साधन होता तोच हातोडा प्रहाराचें अस्त्र बनला, आणि एका स्टॅलिन वाद्याचा हातोडा ट्रॉट्स्कीचें डोकें फोडण्याच्या कामीं आला. आम्ही गांधीवाद्यांनीं जर गांधीचा वाद बनविला, तर अहिंसेची शपथ घेऊन, आम्ही चरख्याच्या अणकुचीदार त्राकीनें एकमेकांला भोकसल्यावांचून राहणार नाहीं. म्हणूनच कधीं कधीं फार विचित्र दृश्यें आढळतात. 'अहिंसा परमो धर्मः' हीं अक्षरें भरीव सोन्याचीं बनविलेलीं असतात आणि हातांत नंगी तलवार घेऊन एक पहारेकरी त्याचें रक्षण करीत आहे असें दृश्य आपल्याला दिसतें. म्हणून आपल्याला जर माणूस जगवायचा असेल तर त्याला संप्रदाय आणि धर्माच्या गुलामींतून व वादांच्या पिंजऱ्यांतून मुक्त करावें लागेल. कारण वाद, संप्रदाय आणि धर्म माणसाच्या व्यक्तित्वाचा चुराडा करतात.

## क्रान्तीचा हेतु—परिश्रमाची प्रतिष्ठा वाढविणें

क्रांति म्हणजे मूल्य—परिवर्तन. समाजांतील प्रचलित मूल्यांच्या प्रतिष्ठेचा अन्त करणें आणि नव्या क्रांतिकारी मूल्यांची स्थापना करणें हें क्रांतीचें उद्दिष्ट आहे. आम्हांला कोणत्या क्रांतिकारी मूल्यांची प्रतिष्ठा स्थापन करावयाची आहे, हें, आपल्या देशांतील आणि जगांतील प्रमुख पक्षांच्या झेंड्यांकडे पाहिलें कीं आपल्या ध्यानांत येईल. साम्यवादी—पक्षाच्या ( कम्युनिस्ट—पार्टी ) झेंड्यावर हातोडा आणि कोयत्याचें चिन्ह आहे; प्रजा-समाजवादी पक्षाच्या झेंड्यावर नांगर आणि चाकाचें चिन्ह आहे; आणि काँग्रेसच्या झेंड्यावर चरख्याचें चित्र आहे. याचा अर्थ असा आहे कीं, उत्पादक परिश्रमाची प्रतिष्ठा स्थापन झाली तरच क्रांतीचें ध्येय पूर्ण होईल, आणि तेव्हांच मनुष्याची किंमत वाढेल.

## ‘ त ’ कारांचें तांडव

आज तख्त, तिजोरी आणि ह्या दोहोंची मैत्रीण तलवार ह्या तीन सत्तांनीं माणसाची प्रतिष्ठा धुळींत मिळविली आहे. शस्त्रवाद प्रायः सत्तावाद आणि संपत्ति—वादाचा हस्तक बनून येत असतो. तो त्यांचा सख्खा भाऊ आणि निरंतर स्नेही असावा असें वाटतें.

## तख्ताचें तत्त्वज्ञान

ज्याच्या हातांत सत्ता असते त्याचा कुणावरच विश्वास नसतो. देवांचा राजा इंद्र ह्या सर्वांत मोठा सत्ताधीश आहे. त्याच्या सत्तेला हजारों छिद्रें आहेत, म्हणून त्याला हजार डोळे आहेत. जितकीं छिद्रें असतील तितकी सावधपणाची आवश्यकता वाढत जाते. इंद्र देवांचा राजा होता व वृत्र राक्षस होता, तरीहि वृत्र अधिक शौर्यानें आणि उदार-हृदयानें लढला. त्याच्यासमोर इंद्र निकृष्ट ठरला. कारण सत्ता हें इंद्राचें परममूल्य होतें, त्यामुळें त्याला सर्वांचा संशय येत असे. तिन्ही लोकांत त्याचा कुणीहि—एकहि—मित्र नाहीं. सिंहासन मिळविण्यासाठीं त्यानें कठोर

तपस्या केली. त्यामुळें, दुसरा कोणी तपस्या करूं लागला कीं, 'हा माझें सिंहासन तर घेणार नाहीं ना' अशी त्याला शंका येते. त्यामुळें तपस्व्यांना तपोभ्रष्ट करणें हा त्याचा सगळ्यांत महत्त्वाचा कार्यक्रम असतो. ह्यालाच सत्तावादी राजकारण असें म्हणतात. सत्तावाद्याला कुणाचाच विश्वास नसतो. त्याला आपला बाप, भाऊ आणि मुलांचें देखील भय वाटतें. त्याला कुणी नातलग नाहीं, मित्र नाहीं आणि आत्मीयहि नाहीं. इतरांवर विश्वास ठेवून तो अन्नसुद्धां खाऊं शकत नाहीं. हेंच सत्तावादी राजनीतीचें स्वरूप आहे. जगांत आज त्याचाच बोलबाला आहे. त्यामुळें माणूस माणसाच्या जवळ येऊं शकत नाहीं. म्हणून मी याला तख्ताचें अथवा सत्तेचें तत्त्वज्ञान म्हणत असतों.

## चोर, संग्रहाचा मुलगा

तिजोरीसुद्धां माणसाला माणसापासून अलग करते. कुलुपाचा कोणीं शोध लावला असें जर आपणांस विचारलें तर कदाचित् आपण त्याचें नांव सांगूं शकणार नाहीं. परन्तु विचार केला तर ज्यानें कुलूप शोधलें तो स्वतः चोर जरूर असला पाहिजे असें आपण अवश्य म्हणाल. कारण संग्रह पाप आहे, आणि संचय चोरी आहे. जी वस्तु दुसऱ्याच्या गरजेची असते पण ह्या वेळीं जिची मला गरज नसते, ती सांभाळून ठेवण्यासाठीं मी कुलूप लावतों, कुलूपहि असें शोधतों कीं ज्याला एकच किल्ली लागेल. किल्ली जानव्याला ठेवतों आणि जानवें कडोसरीला लावतों. कारण कुटुंबांतील कुणाच्या हातीं किल्ली जाणार तर नाहीं ना अशी भीति वाटते. सगळ्यांत जास्त भीति मोठ्या मुलाची वाटते. कारण त्याचा पहिला हक्क असतो. राजालाहि सगळ्यांत मोठ्या मुलाचें अधिक भय वाटतें. नेहमीं संग्रहाच्या कुशींतूनच चोरी निर्माण होते. चोर कृपणाचा मुलगा असतो. म्हणूनच 'माझ्या राज्यांत एकहि चोर नाहीं कारण कुणीहि कंजूष नाहीं' असें आपल्या राज्याचें वर्णन करतांना अश्वपति राजानें मोठ्या अभिमानानें म्हटलें होतें. म्हणून जोंवर

संग्रह आणि संचय राहील तोंवर चोरी आणि भीकाहि राहील. ह्या एकाच शिक्क्याच्या दोन बाजू आहेत.

## भित्र्याची संतान, क्रूरता

जी गोष्ट तिजोरीला लागू आहे तीच तलवारीलाहि लागू आहे. ज्याच्या मनांत प्रथम तलवार आली तो निःसंशय भित्रा असला पाहिजे. तिजोरी लोभांतून निर्माण झाली आणि तलवारीचा जन्म भयांतून झाला. जो दुसऱ्यापासून सुरक्षित राहूं इच्छितो म्हणजे इतरांचें ज्याला भय वाटतें, तोच किल्लेबंदी आणि हत्यारबंदी करीत असतो. आक्रमण हें उत्तम संरक्षण मानलें जातें. म्हणून इतरांपासून जो सुरक्षित राहूं इच्छितो, तो नेहमीं दुसऱ्यावर वार करण्याची संधि बघत असतो. क्रौर्य आणि भय, निर्दयपणा आणि भित्रेपणा हे एकाच शिक्क्याचे दोन पैलू आहेत. साऱ्या पुराणांत राक्षस महान् तपस्वी होते असें म्हटलें आहे. परंतु प्रखर तपस्येनंतर प्रत्येक राक्षसानें, मला कोणी मारूं नये असेंच वरदान मागितलें आहे. सर्व बाजूंनीं भयाची शंका त्याला आहे असा त्याचा अर्थ आहे. सारे आपला जीव घ्यायला टपून बसले आहेत असें त्याला वाटतें. जो सर्वांना आपला शत्रु समजतो तो स्वतःच सर्वांचा शत्रु बनतो. ज्याला सर्वांपासून रक्षण हवें असतें त्याचेंच नांव 'राक्षस' आहे.

## तीन आंधळ्या डाकिणी—तख्त, तलवार व तिजोरी

थोडक्यांत, जो गादीवर बसला किंवा जो गादीवर बसूं इच्छितो त्याला नेहमीं दुसऱ्याचें भय वाटतें. ज्याच्याजवळ तिजोरी—सम्पत्ति आहे तो जगभराला भितो. तख्त आणि तिजोरीच्या रक्षणासाठीं तलवारीनें जन्म घेतला. म्हणून जोंवर तख्त आणि तिजोरीच्या सत्तेचा अन्त होणार नाहीं तोंवर तलवारीचाहि अन्त होणार नाहीं आणि जोंवर तख्त, तिजोरी आणि तलवारीचा अन्त होणार नाहीं, तोंवर माणूस माणसाच्या जवळ

येऊं शकणार नाहीं. माणसाला माणसापासून अलग करणारीं सत्तावाद, सम्पत्तिवाद आणि शस्त्रवाद हीं तीन कारणें आहेत. सत्तावादामुळें मनुष्य मनुष्यावर अधिकार गाजवूं इच्छितो, सम्पत्तिवादाच्या प्रभावामुळें मनुष्य मनुष्याला खरेदी करूं इच्छितो आणि शस्त्रवादाच्या जाळ्यांत सांपडल्या-मुळें मनुष्य मनुष्याला दाबूं इच्छितो. म्हणून या तीनहि सत्ता, मानवतेची गळचेपी करणाऱ्या आहेत. पुरातन ग्रीक पुराणांत तीन भुऱ्या डाकिणींची कहाणी आहे. त्या तिघींत एकच डोळा होता. एका चतुर वीर पुरुषानें संधि साधून डोळा काढून घेतला. त्या तिघी डोळा बदलीत होत्या. तेव्हां त्या वीर पुरुषाला उत्तम संधि मिळाली. सिंहासन, सम्पत्ति आणि तलवार ह्या तिन्ही सत्ता आंधळ्या आहेत. त्या माणसाला उन्मत्त बनवितात. आपण सत्तांध, धनांध आणि मदांध म्हणतच असतों.

## फुलें वाढलीं पण सुगंध कमी झाला !

याचा परिणाम असा झाला आहे कीं, जगांत माणसांची संख्या वाढत आहे, पण माणुसकी कमी होत आहे. माझ्या बगिच्यांत मोगऱ्याचीं झाडें फुलांनीं डंवरलीं आहेत, पण सुगंध कमी होत आहे असें जर एखाद्यानें आपणांस सांगितलें तर आपणांस त्याचें विधानच विचित्र नाहीं वाटणार ? आपण म्हणाल, मग तुमच्या झाडांचीं फुलें असली नसून नकली असलीं पाहिजेत. नाहींतर फुलांची संख्या वाढत असतांना त्यांचा सुगंध कमी होणें कसें शक्य आहे ? तरीहि माणसें वाढत आहेत पण माणुसकी कमी होत आहे असें जेव्हां कुणी म्हणतात तेव्हां आम्ही त्यांचें म्हणणें निमूटपणें मान्य करतों. ह्याचें कारण असें आहे कीं, माणसाला माणसाची कदर नाहीं. माणसापेक्षां त्याला सत्तेची आणि सम्पत्तीची कितीतरी अधिक कदर आहे.

## ईश्वर, अद्वितीय कलाकार

हेंहि खरेंच कीं आज माणूस एकमेकांच्या निकट येत आहे, जग जवळ येत आहे. लाल लाल डोळे करून, मुष्टी आवळून एकमेकांकडे

धावतांना आपल्याला दोन माणसें दिसलीं तर आपण काय करतों? त्यांना जवळ येऊं देत नाहीं. कारण ते एकमेकांजवळ आले तर त्यांची मारामारी होईल याची जाणीव आपल्याला असते. जोंवर माणूस माणसाजवळ येत नाहीं तोंवर लढाई देखील होऊं शकत नाहीं. हें विश्व निर्माण करणारा परमेश्वर एक अद्वितीय कलाकार आहे. त्यानें अशी अद्‌भुत रचना केली आहे कीं सान्निध्यावांचून भांडणहि होत नाहीं. एखाद्याची भाषा जर आम्हांला कळली नाहीं तर त्याच्या शिव्यांचा देखील आमच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. म्हणून दोन माणसांचें भांडण होण्याचा रंग दिसतो तेव्हां मधें पडून त्यांना एकमेकांजवळ आपण येऊं देत नाहीं.

## अनन्तवीर्य व अनन्तबाहु विश्वात्म्याचें विश्वरूप

विज्ञानामुळें मनुष्याचें शरीर एकमेकांजवळ आलें आहे हें खरें, परन्तु विज्ञानाला मनुष्याची चित्तवृत्ति बदलतां आलेली नाहीं. मनांत वैर असतांना जर माणूस माणसाजवळ आला तर भांडणाचा धोका वाटतो. भूदान–यज्ञ आन्दोलन हें एक व्यापक आन्दोलन आहे. व्यावर्तक नाहीं. आपल्या क्षेत्रांत सर्वांचा समावेश न करणाऱ्या चळवळीला व्यावर्तक म्हणतात आणि जींत सर्वांचा समावेश होऊं शकतो तिला व्यापक चळवळ म्हणतात. आजवरचीं क्रान्तीचीं आन्दोलनें फक्त गरिबांचीं आन्दोलनें होतीं. म्हणून त्यांत फक्त गरीब सामील होऊं शकत होते, पण अमीर त्यापासून अलग राहात असत. भूदान–यज्ञ–आंदोलन हें गरिबांचा बचाव करणारें आन्दोलन नव्हे. हें अमिरांचा सामना करण्याचेंहि आन्दोलन नव्हे, तर हे गरीब आणि अमीर ह्या दोघांचेंहि आन्दोलन आहे, कारण गरिबांना आणि अमिरांना मिळून गरिबीचा आणि अमिरीचा सामना करावयाचा आहे. ही उभयतांचें कल्याण करणारी पद्धति आहे. ह्यांत एकापासून दुसऱ्याला वांचविण्याची व्यवस्था

आहे. सर्वांनीं सर्वांना वांचवावयाचें आहे. जेव्हां सगळे एकमेकांला वांचवितात तेव्हां लढाई नाहींशी होऊन हात-मिळवणीस सुरुवात होते. दोन माणसांचे दोन दोन हात जेव्हां एकत्र मिळतात तेव्हां साक्षात् चतुर्भुज भगवान् प्रगट होतात. प्रत्येकाला चार हातांचें सामर्थ्य जाणवूं लागतें. दोघांचे मिळून चार हात दिसत असले तरी आठ हातांचें सामर्थ्य त्यांत उत्पन्न होतें. अशा तऱ्हेनें जेव्हां सर्व मनुष्यांचे हात मिळतात तेव्हां अनन्तवीर्य आणि अनन्तबाहु विश्वात्म्याचें विश्वरूप प्रगट होतें. भूदान–यज्ञ–आन्दोलन मानवाच्या विश्वरूप दर्शनाचें आणि त्याच्या सर्वतोमुखी पुरुषार्थाच्या आविष्काराचें आन्दोलन आहे म्हणून तें सर्वांचें आहे आणि सर्वांसाठीं आहे.

## सौजन्याची अट किंवा सौजन्याचें लक्षण

मनुष्य जर मनुष्याला हवासा वाटला नाहीं तर मानवतेचा कदापि विकास होणार नाहीं. आपण आगगाडींत बसलां आहांत. फक्त एका माणसाला झोंपण्याइतकी जागा आपल्याला मिळाली आहे. अशा स्थितींत आपला प्राणप्रिय मित्र जरी आला तरी त्याचें येणें आपल्याला अखरतें. कारण त्याच्या आगमनानें आपल्या आरामांत बाधा पोंचते. ही एका तऱ्हेची मनोवृत्ति आहे. हिलाच हक्क गाजविण्याची मनोवृत्ति असें नांव आहे. ह्यालाच अधिकाराचें तत्त्व म्हणतात. ह्यापेक्षां सर्वस्वीं वेगळ्या मनोवृत्तीचें दर्शन आपल्या घरांतून आपणांस होतें. घरांत जर खुर्च्या कमी असल्या आणि पाहुणे अधिक असले तर आपण उभे राहतां आणि पहिल्यानें अतिथींना जागा देतां. कारण आपण यजमान आहांत आणि येणारे अतिथि आहेत. ते पाहुणे आहेत आणि आपण यजमान आहांत. सभ्यतेचा दंडक असा आहे कीं अभ्यागतांचा उचित समादर, पाहुणचार आपण केला पाहिजे. हिलाच कर्तव्याची मनोवृत्ति म्हणतात. जर एखाद्या सभ्य मनुष्याला जगांत फार गर्दी झाली आहे असें वाटत असेल तर प्रथम स्वतःच जागा रिकामी करा असें सौजन्य सांगतें.

## जनसंख्येच्या वृद्धीवर उपाय—भूक निवारण

परन्तु भगवंताच्या अपरंपार कृपेनें अजून असा प्रसंग आला नाहीं. जनसंख्येवरहि उपाय करतां येईल. समाज–विज्ञानाचा एक सिद्धान्त आहे कीं जिथें भूक नसते तिथें लोकसंख्याहि अधिक वाढत नाहीं. राजे लोकांच्या आणि श्रीमंतांच्या घरीं पुत्र–संख्या नेहमीं कमी असते हें आपणांस ठाऊक आहे. कित्येक वेळ त्यांना दुसऱ्याचा मुलगा दत्तक घ्यावा लागतो. राजा दशरथाला पुत्र–कामेष्टि यज्ञ करावा लागला असें आपल्या पुराणांत लिहिलें आहे. म्हणून जर आपण भुकेचें निराकरण करूं शकलों तर आज ज्या गतीनें लोकसंख्या वाढत आहे, त्या गतीनें वाढणार नाहीं.

## रेडिओ युगांत भुकेचा प्रश्न कां शिल्लक राहावा?

ह्या दृष्टीनें पाहिलें तर भुकेचा प्रश्न एक सांस्कृतिक प्रश्न आहे हें आपल्या ध्यानांत येईल. म्हणून आपल्याला भूकहि वांटून घ्यावी लागेल आणि अन्नहि वांटून घ्यावें लागेल. फक्त उत्पादन वाढविल्यानें भुकेचें निवारण होऊं शकत नाहीं. आज जितकी भूक आपल्याला दिसते ती सगळी अनिवार्य नाहीं. अन्नाची उणीव तर आहेच पण त्यापेक्षां वितरणांतील विषमता कितीतरी पट अधिक आहे. जेवढें अन्न आहे तेवढ्यांसाठींहि साऱ्यांना आमंत्रण नाहीं, सर्वांसाठीं पात्रें ठेवलेलीं नाहींत. उत्पादन तर वाढवावयाचेंच आहे, पण त्या आधीं अन्न आणि भुकेच्या विभाजनाची– वितरणाची–योजना करावी लागणार आहे. अखेर भूक आणि गरिबी मिटविण्यासाठींच अन्नाचें उत्पादन वाढलें पाहिजे असें आपण म्हणतों ना! परंतु फक्त उत्पादन वाढीनें आपलें काम होणार नाहीं. ह्या जगांतील समृद्धि वाढविण्याचीं कित्येक साधनें विज्ञानानें आपल्याला दिलीं आहेत. यंत्रीकरणामुळें उत्पादन मोठ्या प्रमाणावर आणि वेगानें होऊं शकतें. परंतु इतकें सगळें असूनहि आमच्या देशांतील

अधिकांश लोक भुकेले आणि दरिद्री आहेत हें आपणांस माहीत आहे. एक दिवस खादी संबंधींच्या एका सभेंत, “आपण ह्या रेडिओ आणि टेलिव्हिजनच्या युगांत चरख्याची गोष्ट कशी काढूं शकतों?” असें एकानें पंडित नेहरूंना विचारलें. नेहरू म्हणाले, ‘मी काय करूं? ह्या रेडिओ आणि टेलिव्हिजनच्या जमान्यांत, भूक, बेकारी आदि समस्या कां म्हणून आहेत? असा प्रश्न आपण कां विचारीत नाहीं? म्हणूनच चरखा, हातमाग, आणि हस्तोद्योगाचा विचार आम्हांला करावाच लागेल.’

## भूक—एक सांस्कृतिक समस्या

जगांत विज्ञान आणि वैभवाच्या प्रगतीबरोबरच जर भूक आणि गरिबी कायम राहिली, तर त्या विज्ञानाचें मनुष्याच्या दृष्टीनें काय मूल्य आहे? म्हणूनच भूक आजच्या जगांतील एक सांस्कृतिक समस्याहि आहे, असें मी सुरवातीलाच म्हटलें. सत्तावाद आणि संपत्तिवादामुळें माणसाला माणसाचा संशय येतो आणि भीति वाटते, त्यामुळें उत्पादन उपयोगासाठीं होत नाहीं आणि साधारण जनतेला शस्त्राच्या साहाय्यानें दाबावें लागतें. ह्यावर एकमेव इलाज असा आहे कीं उत्पादन मनुष्या-साठीं आणि मनुष्य-द्वारां झालें पाहिजे. जेव्हां सारेच उत्पादक होतील तेव्हां अनुत्पादकांची संख्या वाढणार नाहीं आणि आज साऱ्या जगांत जी लोकसंख्येची समस्या भीषणरूप धारण करीत आहे ती देखील बरीच सौम्य होईल.

तात्पर्य असें कीं जोंवर भूक आहे तोंवर कला, संस्कृति आणि नैतिकतेचा विकास अशक्य आहे. दैववाद याचें उत्तर देऊं शकत नाहीं. ‘जसें ज्याचें कर्म असेल तसें फळ परमेश्वर त्याला देत असतो.’ ह्याला कर्म सिद्धान्त म्हणतात. आज शेंकडा ऐंशी लोकांना पोटभर जेवायला मिळत नाहीं. शंभरांतील पांच माणसें सुखी आहेत आणि पंचाण्णव दुःखी आहेत. ह्याचा अर्थ असा झाला कीं, आजच्या जगांत पाप्यांची संख्या अधिक आहे. असें जग भगवन्ताचें असूं शकत नाहीं. तें सैतानाचेंच

असलें पाहिजे. जर कर्म–सिद्धान्त खरा असला, तर आजच्या जगांत जें कांहीं वाईट आहे, त्याला मनुष्य जबाबदार आहे, त्यांत ईश्वराचा कांहीं दोष नाहीं, माणसाच्या दृष्टि आणि वृत्तीचा दोष आहे. 'तुझा आत्माच वाकडा झाला आहे' असें रामकृष्ण परमहंसांनीं एका माणसाला म्हटलें होतें. हाच मूलभूत दोष आहे. म्हणून चांगल्या दृष्टीची सर्वांत अधिक गरज आहे. ह्यालाच आपण दर्शन म्हणतों. भगवन्तांनीं अर्जुनाला जेव्हां दिव्य चक्षु दिले तेव्हांच त्याला विश्वरूप पाहतां आलें. क्रान्ती-साठींहि नव्या दृष्टीची गरज असते. डोळे, कान, नाक तर सर्वांनाच असतें, पण मनुष्याच्या पाहण्यापाहण्यांत फरक असतो.

मुख, श्रवण, दृग् नासिका सब ही के इक् ठौर ।
कहबो, सुनबो, देखबो चतुरन के कछु और ।।

(सर्वांना तोंड, कान, डोळे आणि नाक सारखेंच असतें,
पण चतुर मनुष्याचें बोलणें, ऐकणें, पाहणें औरच असतें.)

## क्रान्तीसाठीं दिव्य-दर्शनाची गरज

क्रान्तीचें देखील एक विशिष्ट दर्शन असतें. तें आमची दृष्टि बदलून टाकतें. वस्तु तीच असते परन्तु आमची तिच्याकडे बघण्याची दृष्टि मात्र बदलते. निराशावाद्यांचें मन खट्टू असतें. तो म्हाताऱ्यासारखा कुढत आणि कुरकुरत असतो. गुलाबाचें फूल देखील कांट्यानें घेरलेलें आहे अशी त्याची तक्रार असते. उलट आशावादी लोकांचें हृदय मधुर-तेनें व्यापलेलें असतें. कांट्यांच्या परिसरांतहि तें गुलाबाचें फूल डुलत आहे असें मानून तो आनंदित होतो. म्हाताऱ्यासाठीं जीवन स्मशान-यात्रेसारखें बनतें. पण तरुणासाठीं तेंच जीवन मृत्यु पार करण्याचें एक साधन बनतें. क्रान्तीसाठीं अशा दिव्य–दृष्टीची गरज असते. 'जिथें दर्शन नाहीं तेथील लोक नष्ट होतात' असें स्वतंत्र इटलीचा द्रष्टा मॅझिनी यानें म्हटलें आहे. आमच्या संस्कृत भाषेंत नष्ट मनुष्य दुष्टापेक्षांहि

निकृष्ट मानला जातो. दुष्टतेचें निराकरण होऊं शकतें. तो सुष्ट बनूं शकतो. परन्तु ज्याचें चित्तच शून्य झालें, ज्याला कांहीं अव-ठिकाण राहिलें नाहीं त्याला नष्ट म्हणतात.

८200

## क्रान्तदर्शी विनोबा

म्हणून क्रान्तीसाठीं, कार्यकर्त्याला, सर्वांत आधीं दर्शनाची आवश्यकता असते. नग्न, भुकेल्या आणि बेकार दरिद्री मानवांत ईश्वराचें दर्शन करण्यासाठीं विनोबा निघाले आहेत. त्यांच्या बाबतींत आतां ही कवि-कल्पना किंवा भाषेचा अलंकार राहिलेला नाहीं. विनोबांना मागासलेल्या आणि दबलेल्या मानवांत ईश्वराच्या सामर्थ्याचा आणि मांगल्याचा साक्षात्कार होत आहे. जनतेंत दडलेली शक्ति आणि गुण गांधींना दिसत होते तसेंच विनोबांनाहि दिसत आहेत. अशी व्यक्ति क्रान्त-दर्शी असते.

## भुकेला कशालाहि ओळखीत नाहीं

जो भुकेला असतो त्याला धर्म, नीति अथवा संस्कृति कांहींहि नसते. भुकेल्याचें दर्शनच वेगळें बनतें. कारण मनुष्याचें सारें व्यक्तित्वच भुकेमुळें चोळामोळा होतें. भुकेल्याला कशाचीच दरकार नसते. पुरातन काळांत आपल्या देशांत समृद्धि होती, कुणी भुकेला अथवा दरिद्री नव्हता ही कल्पना भ्रामक आहे. भुकेमुळें ज्यांच्या व्यक्तित्वाची हानि झाली, अशीं पुरातन काळांतील कांहीं प्रमुख उदाहरणें आपल्या समोर ठेवतों.

## ‘ अन्नं ब्रह्मेति व्यजानात् ’

भुकेल्या भृगूनें आपल्या पित्याला म्हणजे वरुणाला ब्रह्मासंबंधीं विचारलें. वरुण म्हणाला, ‘ ज्यापासून हे सारे प्राणी निर्माण होतात, ज्यामुळें त्यांचें पालन होतें आणि मृत्यूनंतर ते ज्यांत विलीन होतात,

तेंच ब्रह्म होय' भृगूच्या पोटांत भुकेची आग प्रज्वलित झाली होती. त्याचें दर्शन हें भुकेचें दर्शन होतें म्हणून तो म्हणाला, 'मला सारें कांहीं समजलें आहे. माझ्या दृष्टीनें अन्न हेंच ब्रह्म आहे.'

## 'श्वेतकेतूची अन्यमनस्कता'

श्वेतकेतूला, 'तत्त्वमसि' 'ते तूं आहेस' या महावाक्याचा उपदेश करण्यांत आला. त्याप्रमाणें तें वाक्य त्याला शिकविण्यांत आलें. परंतु पंधरा दिवस उपवास केल्यानंतर तूं शास्त्रांत जें कांहीं शिकला असशील तें आम्हांला सांग असें जेव्हां त्याला म्हटलें तेव्हां पंधरा दिवसांनंतर तो म्हणाला, 'आतां मी गोंधळल्यासारखा—अन्य-मनस्क—झालों आहें. मला कांहींच आठवत नाहीं. हीं दोन्ही उदाहरणें उपनिषदांतून घेतलीं आहेत.'

## 'उशस्तीनें उष्टें कुळीथ खाल्लें'

तिसरें उदाहरण चाक्रायण उशस्तीचें आहे. त्याला पौरोहित्य करायला जावयाचें होतें. परंतु भुकेनें त्याला इतकें सतावलें कीं त्याचें डोकेंच चालेना. अखेर एका माहुताचें उष्टें कुळीथ जेव्हां त्यानें खाल्लें तेव्हां कोठें त्याच्या जिवांत जीव आला. ह्याशिवाय पुराणांतील महर्षि विश्वामित्राचें आपल्या सर्वांच्या परिचयाचें आणखी एक उदाहरण आहे. तें आपणांस माहीतच आहे.

## भुकेलेला मनुष्य रुष्टहि असतो

भुकेला माणूस आपला तोल सांभाळूं शकत नाहीं. कामाहून घरीं परत आला तर कुणाशीं नीट बोलतहि नाहीं. 'जो भुकेला असतो तो रुष्ट असतो' अशी एक इंग्रजी म्हण आहे. मोठ्यांत मोठा कवि जर भुकेला असला, आणि 'जरा ह्या चंद्राकडे तर पहा; कसा एखाद्या सुंदर स्त्रीच्या मुखासारखा दिसतो तो' असें जर आपण त्याला म्हटलें,

तर निदान ह्या घटकेला तरी चंद्र मला एखाद्या गोल गोल पुरीसारखा दिसत आहे असें तो म्हणेल. हनुमानानें तर जन्मल्या बरोबर भुकेमुळें सूर्यालाच फळ मानलें. म्हणून जोंवर अधिकांश लोक उपाशी राहतील तोंवर ह्या जगांत सभ्यता आणि संस्कृतीचा विकास होणें अशक्य आहे. म्हणून ज्यांना संस्कृतीची चिंता आहे, त्यांनीं सर्वांत आधीं भुकेचा प्रश्न सोडविण्याचा विडा उचलला पाहिजे.

## भुकेचे प्रकार

ह्या जगांत भूक दोन प्रकारची असते. एक प्राकृतिक आणि दुसरा कृत्रिम. मनुष्याच्या सर्व प्रयत्नानंतरहि जी केवळ नैसर्गिक कारणांमुळें शिल्लक राहते, तिला आपण नैसर्गिक भूक म्हणतों.

## जमिनीची उत्पादनक्षमता

भुकेच्या प्राकृतिक कारणांचा विचार करतांना साऱ्या जगांतील भुकेच्या समस्येचाहि विचार करणें आवश्यक आहे. जितक्या गतीनें जंगलांचा नाश होत आहे आणि जमिनीवर राहणाऱ्या जंगली जनावरांचा विध्वंस होत आहे, त्यामुळें तितक्याच वेगानें जमिनीची उत्पादन क्षमता कमी होत आहे. म्हणून मनुष्याचा मनुष्याशीं असलेला संबंध हा जरी आपल्या अध्ययनाचा विषय असला तरी मनुष्याचा त्याच्या भोंवतालच्या परिस्थितीशीं असलेल्या संबंधाचा विचार करणें तितकेंच आवश्यक झालें आहे. वनस्पति, किटाणु आणि इतर सारे जीवधारी प्राणी जमिनींतून जितकें घेतात त्याचा फार मोठा भाग जमिनीला परतहि करतात. त्यामुळें जमीन उपजाऊ होते. वृक्ष आणि वनस्पति सूर्यापासून जीवन-शक्ति घेऊन ती जमिनीला देतात. म्हणून जंगलांचा आणि जनावरांचा जितका विध्वंस होत गेला त्या प्रमाणांत जमिनीला ही प्राणशक्ति कमी मिळत गेली. याचा परिणाम असा झाला कीं आज शेतीसाठीं उपयुक्त अशी पुष्कळशी जमीन कमी होत आहे आणि तिची एकसारखी धूप चालू आहे. हा क्रम असाच चालू राहिला

तर कृषि–योग्य सारी जमीन बिलकुल बेकार होईल असें वैज्ञानिकांचें म्हणणें आहे. म्हणून जगांतील कृषि–वैज्ञानिकांचें आणि आहार–शास्त्रज्ञांचें इकडे लक्ष लागलें आहे.

## कृत्रिम स्त्री–पुरुष निर्माण होतील

कृत्रिम खतानें जमिनीची उपज वाढविण्याचा प्रयत्न देखील धोक्याचा आहे. वनस्पतींमुळें आणि जीवधारी प्राण्यांमुळें जें खत मिळतें त्यानें पृथ्वीला प्राण–शक्तीची प्राप्ति होते. पृथ्वी प्राण्यांना जगविते आणि प्राणी पृथ्वीला सुपीक बनवितात. अशा तऱ्हेचें आदान-प्रदान उभयतांना लाभदायक असतें. पण कृत्रिम खतांत ही शक्ति नाहीं. कृत्रिम खतें एक प्रकारच्या जबरदस्तीनें पृथ्वीचें शोषण करतात, तिची प्रतिकार-क्षमता आणि उत्पादन-शीलता वाढवूं शकत नाहींत. कृत्रिम खतानें कृत्रिम अन्न निर्माण होईल, आणि कृत्रिम अन्नानें कृत्रिम स्त्री–पुरुष निर्माण होतील, येथवर कांहीं वैज्ञानिकांचें म्हणणें आहे.

## धरणीमातेचें निरन्तर शोषण

यंत्रीकरणानंतर पृथ्वीचें इतक्या वेगानें शोषण झालें आहे कीं त्यामुळें उत्पादनाच्या मूल–द्रव्यांचा संग्रह फार लवकर नष्ट होण्याचें भय निर्माण झालें आहे. गेल्या तीन–चारशें वर्षांत, पृथ्वींतून जितकें पाणी, कोळसा आणि तेल काढण्यांत आलें आहे तितकें तत्पूर्वीच्या तीन हजार वर्षांतहि काढलें गेलें नव्हतें. अशा तऱ्हेनें, अनेक प्रकारें धरणी मातेचें शोषण अव्याहत चालू आहे. त्यामुळें हा देखील जगांतील वैज्ञानिकांच्या चिंतेचा विषय बनला आहे. आतां मूल–द्रव्याच्या संचित निधीवर आधारलेली अर्थनीति जास्त दिवस चालायची नाहीं.

## उद्‌बोधक व रोचक संशोधन

परन्तु हें सारें खरें असलें तरी परिस्थिति अजूनहि निराशाजनक नाहीं. कारण जमिनीची उत्पादनक्षमता वाढवूनहि तिच्या संरक्षणाच्या

उपायांचा शोध करतां येणें शक्य आहे आणि आज असे उपाय शोधण्याचा प्रयत्नहि चालू आहे. जगांतील वैज्ञानिक याविषयीं नव-नवीन आविष्कार करीत आहेत, आणि आज जितकी जमीन कसली जाते त्याच्या दोन तृतीयांश अधिक जमीन कृषियोग्य बनविली जाऊं शकते, आणि जमिनीची कोणत्याहि प्रकारची हानि न होतां उत्पादनाहि वाढविलें जाऊं शकतें; असा निष्कर्ष त्यांनीं काढला आहे. ह्यासंबंधीं जें संशोधन झालें आहे त्याचें अध्ययन जितकें उद्‌बोधक तितकेंच रोचकहि आहे.

## रोपट्यांना शाळेंत पाठविणें

भूदानांत निकस आणि बंजर जमीन मिळते असें म्हणणाऱ्या लोकांनीं, निकस आणि बंजर जमीन शिल्लकच राहिली नाहीं, हें वैज्ञानिकांनीं सिद्ध केलें आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे. रशियांत एक नवा प्रयोग यशस्वी झाला आहे. ' रोपट्यांना शिकविणें, रोपट्यांना शाळेंत पाठविणें.' असें त्या प्रयोगाचें विचित्र पण मनोरंजक नांव आहे. उदाहरणार्थ—जर गव्हाचें रोपटें एका विशिष्ट प्रकारच्या जमिनींत, वातावरणांत आणि खास परिस्थितींत निर्माण होत असेल, तर प्रयोगशाळेंत वेगळ्या प्रकारच्या जमिनींत, वातावरणांत आणि परिस्थितींत वाढण्याची संवय त्या रोपट्यांना लावली जाते. त्यामुळें आज सैबेरिया आणि उत्तर-ध्रुवानजीकच्या बर्फमय प्रदेशांतहि गव्हाचें पीक डुलत असतांना आपल्याला दिसतें.

## विज्ञानापेक्षां माणूस मोठा आहे

या सर्व परिस्थितीवरून आपण असा निर्णय घेतला पाहिजे कीं, विज्ञान जगांतील प्राणिजीवन संपन्न आणि समृद्ध करण्यासाठीं आहे. आजवर, विज्ञानामुळें, एकीकडे उत्पादन आणि साधन—संपन्नता वाढत असतांना दुसरीकडे जीवन क्षीण होण्याचा धोका कायम होता. परन्तु

आज मनुष्य आपल्या विज्ञानापेक्षां अधिक मोठा आहे ही भगवन्ताची असीम कृपा आहे. म्हणून नैसर्गिक भुकेचा प्रतिकार करण्यांतहि त्याच्या बुद्धीला आशातीत सफलता मिळाली आहे आणि त्यामुळें हताश होण्याचें कारण नाहीं. फक्त संयम आणि विवेकाची गरज आहे. अन्नोत्पादनाचीं साधनें आणि पद्धति अशीं असलीं पाहिजेत कीं, ज्यामुळें धरणीचें कमींत कमी शोषण होईल आणि उत्पादनाच्या मूलद्रव्याचें संरक्षण होईल. त्याचप्रमाणें ज्या जीवांमुळें धरणीला पोषणद्रव्यें मिळतात त्यांचा निष्कारण संहारहि होऊं नये. हें सारें करावयाचें झाल्यास, मोठ्या प्रमाणावरील यांत्रिक उत्पादनापेक्षां विकेन्द्रित आणि विवेकपूर्ण उत्पादन अधिक लाभदायी ठरेल.

## हृदयाचे तुकडे न होवोत

भूदान-यज्ञ-आन्दोलनामुळें जमिनीचे लहान लहान तुकडे होतील अशीहि कांहीं लोकांना भीति वाटते. परंतु अंकशास्त्राच्या हिशेबानें जगांत दर-माणशीं फक्त दीड एकर जमीन पडते, असें जगांतील अंकशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. विज्ञानाच्या हिशेबानें मांसाहारी लोकांना माणशीं २॥ एकर आणि निरामिश लोकांना १॥ एकर जमीन पुरेशी होते. प्रत्यक्ष अनुभवहि असाच आहे. ज्या ठिकाणीं, तीन एकरांपासून सात एकरांपर्यंतच्या जमिनीच्या तुकड्यांवर एका कुटुंबाचा निर्वाह होतो, असे कित्येक देश पृथ्वीच्या पाठीवर आहेत. म्हणून जमिनीचे तुकडे होतील ह्यासाठीं घाबरण्याची मुळींच गरज नाहीं. कम्युनिस्ट-साम्यवादी-क्रांतिनंतर, पूर्व युरोपांत जेव्हां जमिनीच्या वितरणाची समस्या निर्माण झाली, तेव्हां जमिनीचे इतके लहान-लहान तुकडे झाले कीं 'हे तुकडे मरण्यासाठीं फार मोठे आहेत आणि जगण्यासाठीं फार लहान आहेत' अशी विनोदपूर्ण भाषेंत लोकांनीं तक्रार केली; पण ह्याच लहान-लहान तुकड्यांनीं प्रथम शेतकऱ्यांचा स्वाभिमान वाढविला आणि त्यानंतर त्यांतूनच सहकारी शेतीची प्रेरणा जागृत केली. विनोबाहि

आपल्या अनुपम चिंतनात्मक शैलींत म्हणतात. ‘मला जमिनीचे तुकडे होण्याची फारशी फिकीर नाहीं— पण माणसाच्या हृदयाचे तुकडे होण्याची फार चिंता आहे. जर जमिनीचे तुकडे झाल्यानें माणसाच्या हृदयाचे तुकडे होण्याचें टळत असेल तर हे जमिनीचे तुकडे आपोआप जुळून जातील.’

## विनोबा व वैज्ञानिकांचें मतैक्य

जगांतील वैज्ञानिकहि विनोबांच्या विधानाचें एकमतानें समर्थन करतात. वैज्ञानिकांच्या सर्व आविष्कारांचा निष्कर्ष असा आहे कीं, आजच्या जगांतील लोकसंख्येच्या दुप्पट लोकसंख्या जरी २० वर्षांत झाली, तरीहि तिचें पोषण करण्याची क्षमता धरणीमातेच्या उदरांत आहे. फक्त संयम आणि विवेकानें विज्ञानाला समृद्ध करण्याची गरज आहे.

## पंक्तिभेदामुळें कृत्रिम भूक

कृत्रिम भूक मनुष्यकृत आहे. समाजांत मनुष्यानें जे भेद निर्माण केले आहेत त्यामुळें ही भूक कायम आहे. पांच–सहा इसम मेजवानी-साठीं मोटारींत बसून जातात. तिथें फक्त पांच माणसांचीं ताटें वाढलेलीं असतात. पण पांच माणसांपेक्षां किती तरी अधिक लोकांना पुरेल इतकी भोजन–सामुग्री तयार असते. तरीहि मोटारीबरोबर असलेला मोटार ड्रायव्हर–गाडी हांकणारा–आणि क्लीनर–गाडी साफ करणारा–दोघेहि उपाशी बसलेले असतात. ही भूक प्राकृतिक नसून मनुष्य–कृत आहे, आणि म्हणूनच कृत्रिम आहे. विषम–वितरण आणि पंक्ति–भेद हीं तिचीं मूळ कारणें आहेत. जेवढें अन्न आहे तेवढ्याचेंहि योग्य वितरण झालेलें नाहीं. गांवांत केळांचे ढिगारे सडत आहेत, पण गरिबांना एक केळहि मिळत नाहीं. कारण केळीं खाण्यासाठीं नाहींत. विकण्या-साठीं आहेत. याप्रमाणें पंक्ति–भेदामुळें कृत्रिम भुकेचा प्रश्न निर्माण होतो. आमच्या देशांतील कापडाच्या गिरण्या देखील, दरमाणशीं

जितक्या कापडाची गरज आहे, त्याच्या जवळ जवळ अर्धे कापड निर्माण करतात. तरीहि विदेशांत आपलें कापड विकण्याच्या योजना सुरू असल्याचें आपण नेहमीं ऐकतों. फक्त केवळ उत्पादन वाढविल्यानें भूक आणि गरिबीची समस्या सुटत नाहीं, हें या परिस्थितीमुळें सिद्ध होतें.

## अधिक उत्पादनाचें ढोंग आणि युक्तिवाद

म्हणून उत्पादन वाढो अथवा न वाढो पण विषमतेचें तावडतोब निराकरण झालें पाहिजे अशा निर्णयावर आम्ही येऊन पोंचलों आहोंत. अधिक उत्पादनाचें हें बुजगावणें वारंवार पुढें करण्यांत येतें. ‘ गरिबांना कांहीं समजत नाहीं. ते अज्ञानी आहेत. ज्या लोकांना बुद्धि आहे, जें अधिकांत अधिक उत्पादन करूं शकतात, अशा लोकांजवळून जमिनी घेऊन तुम्ही जर ह्या गरिबांना द्याल तर कृषींतील कुशलता कमी होईल आणि उत्पादनहि कमी होईल. आपण साऱ्या देशाच्या दृष्टीनें विचार करीत नाहीं. आपल्याला इतर देशांच्या तुलनेंत आपलें स्थान टिकवून ठेवावयाचें आहे. म्हणून विषमतेच्या निराकरणापूर्वीं देशाची संपत्ति वाढविण्याची आपण काळजी घेतली पाहिजे. ’ येथवर कांहीं लोक म्हणतात.

## पैसा वाढेल पण माणूस मरेल

या लोकांच्या म्हणण्याचा भावार्थ असा आहे कीं आपण मनुष्यांची चिंता सोडून देशाची चिंता केली पाहिजे. पण हा युक्तिवाद अगदींच पोकळ आहे. कारण जर माणसें क्षीण होत जातील तर देशाची दौलत कुणाच्या कामी पडेल? हे कुशल–कृषीचे प्रशंसक तंबाकू, सोप, जिरें, काळें मिरें, मिरच्या आणि भुईमुगाच्या शेंगाचें पीक घेतात. कारण हें सारें उत्पादन मनुष्यासाठीं नसून बाजारासाठीं असतें. म्हणून अशा उत्पादनानें कदाचित् देशांतील पैसा वाढला तरी मनुष्य मेल्या वांचून राहणार नाहीं.

## मकान व दुकानाच्या अर्थशास्त्रांतील फरक

व्यावहारिक भाषेंत सांगावयाचें झाल्यास उत्पादन दुकानासाठीं नाहीं, पण मकानासाठीं झालें पाहिजे, असें आम्ही म्हणूं. दुकानांत सार्‍या वस्तु विकण्यासाठीं ठेवलेल्या असतात, स्वतःच्या वापरासाठीं नाहीं. त्यामुळें दुकान माझ्या आईचें आणि तेंहि माझ्यासाठीं असलें आणि तेथें खाद्यपदार्थ असले आणि मी तिचा प्रत्यक्ष मुलगा जरी असलों, तरी माझी आई दुकानांतील वस्तु मला खाऊं देणार नाहीं. उलट घरांत तयार झालेलें अन्न जर मीं खाल्लें नाहीं तर माझ्या आईला वाईट वाटेल. कारण घरीं तयार होणार्‍या सर्व वस्तु सर्वांच्या उपयोगासाठीं बनत असतात. म्हणूनच घरीं आमची आई आम्हांला आग्रहपूर्वक खाऊं घालते. दुकानांत सौदा असतो, घरांत प्रेम असतें. दुकानाचें अर्थशास्त्र हें सौद्याचें अर्थशास्त्र आहे. पण मकानाचें अर्थशास्त्र हें मानवाचें अर्थशास्त्र आहे आणि म्हणून मकानाचें अर्थशास्त्र हें क्रान्तीचेंहि अर्थशास्त्र आहे. कारण उत्पादन मुनाफ्यासाठीं नाहीं, पण उपयोगासाठीं झालें पाहिजे. हें क्रान्तीच्या अर्थशास्त्राचें सूत्र आहे. वस्तु दुकानासाठीं नाहीं, पण मकानासाठीं बनली पाहिजे असें आम्ही म्हणतों. भांडवलशाही अर्थ-व्यवस्थेंत सारीं माणसें दुकानदार बनतात. आम्ही त्यांना दुकानदाराचें मकानदार बनवितों. हिलाच क्रान्ति म्हणतात.

## लक्ष्मीमाता व भूमातेचा सन्मान

दुकानदारीमुळें आम्हीं लक्ष्मीलाहि बाजारांत आणून बसविली आहे. ज्या लक्ष्मीला आम्ही विष्णु-पत्नी म्हणतों, आम्हांला सारी समृद्धि देणारी आमची माता मानतों, त्याच लक्ष्मीला आम्हीं बाजारबसवी केलें आहे. ह्यापेक्षां अधिक भयंकर असें दुसरें पाप असूं शकतें काय? याचा आपणच विचार करा. दुकानदारीनें लक्ष्मीला बाजार–बसवी बनविलें आणि सत्तावादानें धरणी–मातेचा मानभंग केला. धरणी–मातेलाहि आपण विष्णु-पत्नी म्हणतों आमची आई म्हणतों; पण तिचेच पति

आणि मालक बनण्याची आकांक्षा बाळगतों. ही का आमची सांस्कृतिक भावना! सौद्याच्या भावनेनें लक्ष्मी मातेला वेश्या बनविण्याचा उत्पात केला, आणि जमीनदारीच्या भावनेनें धरणी-मातेला भोगदासी बनविण्याचा उपद्रव केला. ही का आमची सभ्यता! आम्हांला ह्या दोन्ही मातांना बाजारांतून काढून घरांत त्यांची प्राणप्रतिष्ठा करावयाची आहे आणि त्यांची योग्य प्रतिष्ठा व सन्मान मिळवून द्यावयाचा आहे. हें क्रान्तीचें अर्थशास्त्र आहे.

## संपत्तिहि वाढली आणि विपत्तिहि वाढली

भुकेच्या समस्येचें, एक प्राकृतिक आणि दुसरे मनुष्यकृत असे दोन पैलू आहेत हें आतां आपल्या ध्यानांत आलें असेल. माणसानें सौदा आणि दुकानदारीच्या नीतीचा अंगीकार करून, उत्पादन मुनाफ्यासाठीं सुरू केल्यामुळें न्यायोचित वितरण होऊं शकलें नाहीं. ह्याचा परिणाम असा झाला कीं एकीकडे उत्पादन वाढत गेलें आणि दुसरीकडे अधिकांश माणसांची विपत्ति वाढत गेली अशा तऱ्हेच्या विषम व्यवस्थेचें समर्थन धर्महि करीत गेला.

## 'धर्म ही अफूची गोळी आहे'

कार्ल-मार्क्सनें असल्या धर्माला अफूची गोळी म्हटलें. मनुष्याला असल्या तऱ्हेचा विषमतेचा स्वीकार जो धर्म शिकवितो, तो खरोखरच अफूच्या गोळीसारखाच आहे. आम्ही त्याचें कधींच समर्थन करूं शकणार नाहीं. श्रीमंती आणि गरिबी नैसर्गिक आणि अ-निराकरणीय आहे असें साऱ्या पुरातन धर्मांनीं व संस्कृतींनीं मानलें होतें. जगांत सुख आहे आणि दुःखहि आहे. म्हणून तुमच्या शेजाऱ्याच्या दुःखांत तुम्हांला सेवा करण्याची संधि मिळते असें धर्मानें म्हटलें. परंतु दुःख आणि संकट साऱ्यांवरच येत असतें. म्हणून प्रत्येकाचें दुःख ही इतरांच्या सेवेची संधि आहे. परंतु हाच न्याय धर्मानें अमिरीला आणि गरिबीलाहि

लागूं केला. अमिरांसाठीं दानाची संधि कायम राहावी म्हणून भगवंतानें गरिबी निर्माण केली असें प्रत्येक धर्मानें म्हटलें. हा सिद्धान्त फार भयानक आहे. आम्ही तो मानण्याचें नाकारतों.

## सहकारात्मक क्रान्तीचें नवें तंत्र

आम्हांला असा समाज निर्माण करावयाचा आहे कीं, ज्यांत अमिरीहि राहणार नाहीं व गरिबीहि राहणार नाहीं, आणि म्हणून दानाला मुळींच अवकाश राहणार नाहीं. त्यांत सहकार, सहायता, आणि समर्पणाची निरन्तर आवश्यकता राहील. हीं करण्याची संधिहि मिळेल व ती उत्तरोत्तर वाढताहि जातील. पण दानाला मुळींच संधि मिळणार नाहीं. भूदान-यज्ञांतील दानाची योजना, संक्रमण-कालासाठीं आहे. गरिबी आणि अमिरीच्या निराकरणासाठीं सहकारात्मक क्रान्तीचें हें नवें तंत्र आहे.

## आर्थिक क्रान्तीचा मंत्रद्रष्टा ऋषि–मार्क्स

दलित आणि वंचित मानवाला, अमिरी आणि गरिबी निराकरणीय आहे, असा आशादायक संदेश, कार्ल–मार्क्सनें प्रथम दिला. इतकेंच नव्हे तर श्रीमंती आणि गरिबीचें निराकरण हें सृष्टीच्या योजनेचें एक आवश्यक अंग आहे, ऐतिहासिक नियति आहे असेंहि त्यानें म्हटलें. म्हणूनच मार्क्सला आर्थिक क्रान्तीचा मंत्रद्रष्टा ऋषि म्हणण्यांत आलें. ह्या गौरवाचा तो यथार्थ अधिकारी आहे.

## तीन ‘द’ कारांचें दारुण तांडव

जोंवर जगांत भूक असेल तोंवर दुःख, दारिद्र्य आणि दीनताहि कायम राहील. एकीकडे ह्या तीन द-कारांचा, मानवतेचें सत्त्व हरण करण्याचा क्रम अव्याहत चालू राहील. दुसरीकडे संस्कृति, नीति आणि धर्माच्या संरक्षणाचा व उन्नतीचा प्रयत्न चालू राहील, हें अशक्य आहे.

## हितकारक उपवास व हानिकारक भूक

भुकेल्याचा धर्म हा 'वदतोव्याघात' आहे. भूक फक्त अन्नाशिवाय कांहीं जाणत नाहीं, कशाला ओळखीताहि नाहीं. प्रत्येक धर्मानें उपवासाचा महिमा गायिला आहे, भुकेचा नव्हे. भूक अलग वस्तु आहे आणि उपवास अगदींच वेगळी वस्तु आहे. विश्वामित्रानें जेव्हां उपवास केला तेव्हां त्याच्या जीवनांत तपाचें तेज आलें. पण जेव्हां त्याला भुकेनें सतावलें तेव्हां त्याच्या तपस्येची माती झाली. उपवासानें शक्ति वाढते, पण भुकेनें शक्ति क्षीण होते. उपवास हें व्रत आहे, तर भूक ही विवशता—लाचारी—आहे. संन्यास ही निष्ठा आहे, वैधव्य ही विपत्ति आहे. कारण संन्यासानें शक्ति वाढते, वैधव्यानें ती कमी होते. व्रतांत मनुष्याची इच्छा आणि संकल्प प्रधान असतो. उलट विपत्तींत त्याचा नाइलाज आणि लाचारी असते. भुकेच्या निराकरणासाठीं आपल्याला असे उपाय अंमलांत आणावें लागतील कीं ज्यामुळें मनुष्याची व्रतनिष्ठा आणि उपवासाची शक्ति वाढेल. कारण उपवासांत, भोगवृत्तीच्या निराकरणाची आणि संयमाची योजना आहे.

## मानवनिष्ठ व्यवसाय

म्हणून मनुष्याला त्याच्या उद्योगांतून संयमाची दीक्षा मिळेल अशी आमची अर्थरचना असली पाहिजे. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याची पिळवणूक करण्यासाठीं रोजगार करणार नाहीं, तर दरेकाचा व्यवसाय, दुसऱ्याचें जीवन संपन्न करणारा होईल. माझ्या योगक्षेमाचें साधन इतरांच्या योगक्षेमांत मदत करणारें असावें, अडथळा करणारें नव्हे. मतलब असा कीं ज्यामुळें सर्वांचें सामुदायिक हित सिद्ध होईल, असा आमच्या निर्वाहाचा व्यवसाय असला पाहिजे. जेव्हां असें होईल, तेव्हांच आमच्या उद्योगधंद्यांतून मानवनिष्ठेचा विकास होईल.

१७०५५ ३४१ १०७३ २८।१।५४

## जीवन व जीविकेचें अभेद्य नातें

म्हणूनच जुने लोक व्यवसायासाठीं 'वृत्ति' या शब्दाचा उपयोग करीत असत. आपला धंदा कोणता असें न विचारतां, आपली वृत्ति कोणती असा प्रश्न जुना पंडित आपल्याला विचारील. कारण जसा आपला व्यवसाय असेल तशीच आपली वृत्तिहि असेल हें त्याला माहीत असतें. माणूस ज्या प्रकारचा व्यवसाय करतो त्या प्रकारचें त्याचें मन बनत असतें. रस्त्यावर बसणाऱ्या चांभाराचें लक्ष आपल्या जोड्यांकडे असतें आणि न्हावी आपले चेहरे न्याहाळीत असतो. हें सारें सहजपणें, आपोआप होत असतें. त्यासाठीं त्यांना कोणत्याहि प्रकारचा प्रयत्न अथवा योजना करावी लागत नाहीं. अशा प्रकारें जीवन आणि जीविकेचा अभेद्य संबंध आहे. विनोबा याला सीता-रामाचा जोडा म्हणत असतात. माझ्या क्रान्तीच्या प्रक्रियेंत सीता-रामाची उपासना आहे असें त्यांचें म्हणणें आहे. जीवन आणि जीविकेची जोडी कोणीहि तोडूं शकत नाहीं. कालिदासानें वाणी आणि अर्थाला, पार्वती व परमेश्वराच्या संबंधाची उपमा दिली आहे. ज्याप्रमाणें शब्द आणि अर्थाला एकमेकांपासून कुणीहि अलग करूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें जीवन आणि जीविकेची ताटातूटहि कुणाला करतां येणार नाहीं.

## जीवन आणि उप-जीवन

मार्क्सनें, याच सिद्धान्ताचें, आपल्या वैज्ञानिक परिभाषेंत प्रतिपादन केलें आहे. तो म्हणाला, 'जशीं उत्पादनाचीं साधनें, उत्पादनाची पद्धति आणि उत्पादनाचे संबंध असतील तसेच मनुष्याचे राजकीय आणि सांस्कृतिक संबंधहि असतील.' जसें उपजीवन असेल तसेंच समग्र जीवन राहील. 'उपजीवन' (उपजीविका) हा देखील जुना शब्द आहे. जीवनाच्या सगळ्यांत जवळच्या व्यवहाराला उप-जीवन म्हणतात. उप म्हणजे समीप 'उप' म्हणजे अगदीं निकटचें. जीवनाच्या सगळ्यांत जवळ आजीविकेचें साधन आहे. ज्याप्रमाणें अध्यक्षा-

नंतर लगेच उपाध्यक्षाचा क्रम आहे, त्याचप्रमाणें जीवनानंतर उप-जीवनाचा क्रम आहे.

## जीवन आणि उप–जीवनांतील विरोध

आजच्या अर्थ-व्यवस्थेंत एका मनुष्याचें उपजीवन दुसऱ्या मनुष्याच्या जीवनाच्या विरोधांत उभें आहे. आपणासाठीं जें संकट आहे, तेंचि दुसऱ्यासाठीं सुवर्ण-संधि आहे. आणि हेंच विषमतेचें वास्तविक मूळ आहे. सर्वांचें उत्पन्न जवळ जवळ सारखें झालें तर एका ठराविक मर्यादे-पर्यंत विषमता कमी होऊं शकेल पण तिचीं मुळें मात्र तशींच कायम राहतील. अमेरिकेंत सर्वांनाच सुखाचीं साधनें मिळतील आणि उत्तरोत्तर तेथील आर्थिक विषमतेचें निराकरण होईल, अशी जगांतील मातबर विचारवंतांची, दुसरें महायुद्ध सुरू होण्यापूर्वीं कल्पना होती. आज अमेरिकेंतील सर्वसाधारण नागरिक इतर देशांतील लोकांपेक्षां अधिक संपन्न आहे. असेंहि ऐकतों कीं, अमेरिकेंतील मोलकरणी देखील आपल्या स्वतःच्या मोटारींत बसून कामाला जातात. मोटार हाकणारा ड्रायव्हर स्वतःच्या मोटारींत बसून तुमच्या घरीं येतो, स्वतःची मोटार आपल्या मोटर-खान्यांत ठेवतो आणि तुमची मोटार काढून ती दिवसभर चाल-वतो. अर्थात् अमेरिकेंत प्रत्येक जण स्वतःची मोटार ठेवूं शकतो. तेथें वर्गहीन भांडवलवाद (Classless Capitalism) आहे असाहि कांहीं लोकांचा दावा आहे. पण केवळ उत्पन्न जवळ जवळ समान झाल्यानें आर्थिक विषमतेचें निराकरण होऊं शकत नाहीं हें त्यांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे.

## एकाच्या मृत्यूंत दुसऱ्याचें जीवन

वर्गहीन भांडवलवाद ह्या विचित्र शब्दप्रयोगाला कांहीं अर्थच नाहीं. हा शब्द जितका विचित्र तितकाच अर्थशून्य आहे. कुणी अंधकारमय सूर्याची गोष्ट केली तर तें देखील कदाचित् आपल्याला कळेल; परंतु

वर्गहीन भांडवलवाद हा असा शब्द-प्रयोग आहे कीं, कितीहि प्रयत्न करून त्याचा अर्थच कळत नाहीं. जोंवर एका माणसाचा व्यवसाय दुसऱ्या मनुष्याच्या स्वार्थाच्या विरोधी आहे, तोंवर शोषणाचा कदापि अन्त होऊं शकत नाहीं. व्यवसायगत विरोधांतून स्वार्थ-विरोध निर्माण होतो. हेंच आर्थिक विषमतेचें मूळ आहे. आजच्या समाज-व्यवस्थेंत एकाचें संकट ही दुसऱ्याची सुसंधि आहे, एकाची विपत्ति दुसऱ्याचा संपत्ति कमाविण्याचा मंगल मुहूर्त आहे, आणि एकाचें अन्न हें दुसऱ्याचें जहर आहे, म्हणून एकाचा मृत्यु हें दुसऱ्याचें जीवन आहे. कोणताहि डॉक्टर अथवा वैद्य जात्याच दुष्ट नसतो. उलटपक्षीं तो स्नेहशील आणि दयाळू असतो. पण त्याचा व्यवसायच असा आहे कीं, जोंवर कुणी आजारी पडत नाहीं तोंवर त्याचें पोटहि भरत नाहीं. त्याचप्रमाणें कोणताहि वकील, एक व्यक्ति म्हणून संभावित आणि प्रामाणिक माणूस असतो. पण त्याचाहि व्यवसाय लोकांच्या गुन्ह्यावर चालत असतो. म्हणून आपला आजार जितका गंभीर असेल, तितकी वैद्याची पैसे मिळविण्याची संधि मोठी असेल. म्हणजेच तुमचें संकट जितकें मोठें असेल तेवढी मोठी संधि मला मिळेल. मी जर स्मशानांतील लाकडाचा ठेकेदार बनलों तर आपला मृत्यु हें माझ्या जीवनाचें साधन बनेल.

## अनुत्पादक उद्योगांचें निराकरण

हा दुष्टपणा व्यक्तिगत नसून, व्यवसायगत आहे. वाईटपणा, माणसांत नसून त्याच्या व्यवसायांत आहे. म्हणून ज्यांत वैद्याचें आणि वकिलाचें काम, हें पैसे मिळविण्याचें साधन न राहतां समाज–सेवेचें आवश्यक साधन मानलें जाईल, अशा समाज–रचनेची आपल्याला स्थापना करावी लागेल. मनुष्याच्या व्यवसायगत विरोधांचें निराकरण, हें आर्थिक क्रान्तीचें अनिवार्य पाऊल आहे. मनुष्याच्या आजारांवर, गुन्ह्यांवर आणि

व्यसनांवर चालणारे व्यवसाय, हे सारे समाज-विरोधी व्यवसाय आहेत. शोषण-प्रणालीच्या भरंवशावर चालणारे, म्हणजे अनुत्पादक, असेहि इतर अनेक व्यवसाय आपल्या समाजांत आहेत. व्याज अथवा व्याज-बट्टा, दलाली अथवा नफेबाजी, आणि भाडें व ठेकेदारीवर चालणारे सारे व्यवसाय-अनुत्पादक आहेत. म्हणून जोंवर हे व्यवसाय, व्यक्तिगत लाभाचें साधन-रूपांत कायम राहतील तोंवर समाजांतून शोषणाचा कदापि अन्त होणार नाहीं. आमच्या भावी समाज-रचनेंत असल्या प्रकारच्या व्यवहारांसाठीं कमींत कमी अवकाश राहील. जर अल्पतम प्रमाणांत या व्यवहारांची आवश्यकता राहिलीच, तर चरितार्थाचें साधन म्हणून नव्हे पण आवश्यक सामाजिक सेवेचें अंग म्हणून अवशिष्ट राहतील. म्हणून आमच्या आर्थिक क्रान्तीची अनिवार्य शर्त ही राहील कीं ह्या अनुत्पादक व्यवसायांचें निराकरण व्हावें, व समाजसेवेला आवश्यक एवढ्याच अंशांत हे व्यवहार चालू राहावेत.

## गरीब व अमीर यांची माणुसकी वांचविण्याचा मार्ग-भूदान

आतां आजाराचें मूळ कुठें आहे हें आपल्या ध्यानांत आलें असेल. मनुष्य स्वभावतः दुष्ट नाहीं. परंतु त्यानें अशी समाजरचना केली आहे कीं ज्यांत व्यक्ति-व्यक्तींत होड आणि स्पर्धा नेहमीं चालू असते. याचा परिणाम असा झाला कीं गरिबी आणि श्रीमंती निर्माण झाली. अमीर स्वभावतः दुष्ट किंवा हृदयहीन नाहीं, पण अमिरीमुळें त्याच्या ठिकाणीं सैतानपणा आलेला आहे. त्यामुळें दुसऱ्याची विपत्ति आणि विवशतेचा हृदय-हीनतेनें लाभ घेऊन तो आपलें वैभव वाढवितो. गरीबहि स्वभावतः नादान आणि निरुपयोगी नाहीं. पण लाचारीमुळें स्वस्तांत स्वस्त किंमतीला त्याला आपले श्रम विकावे लागतात. आणि आत्यंतिक गरिबी-मुळें तो हैवान ( पशु ) बनतो. आम्हांला गरिबांची गरिबी दूर करून त्यांचा हैवानपणा-पशुत्व-नष्ट करायचा आहे, आणि अमिरांची अमिरी दूर करून त्यांचा सैतानपणा नष्ट करायचा आहे. अमिरी आणि गरिबी

नष्ट करून उभयतांची माणुसकी वांचवावयाची आहे. भूदान-यज्ञ आन्दोलनाच्या प्रक्रियेंत गरिबाचा पुरुषार्थ आणि अमिराचा सहकार आहे. दोघे मिळून माणुसकी टिकवितात आणि वाढवितात.

## सौदा व जुगाराचें अनर्थशास्त्र

आजच्या भांडवलवादी अर्थ–व्यवस्थेंत, मजूर आपले श्रम विकतो आणि मालक ते खरेदी करतो. खरेदी करणाराची कमींत कमी देण्याची इच्छा असते व विकणाराची कमींत कमी काम करण्याची इच्छा असते. याला सौदा म्हणतात. सौदा हें भांडवलवादी अर्थ–रचनेचें प्राणभूत तत्त्व आहे. 'कमींत कमी द्या, आणि अधिकांत अधिक घ्या' असा सौद्याचा अर्थ आहे. जो ग्राहक, बाजारांतून चांगल्यांत चांगली वस्तु कमींत कमी किंमतीला आणतो तो व्यवहार–चतुर मानला जातो. जो दुकानदार निष्कृष्ट वस्तु अधिकांत अधिक किंमतीला विकतो, तो चतुर सौदागर मानला जातो. त्याचप्रमाणें जो कमींत कमी काम करतो, आणि अधिकांत अधिक दाम घेतो, तो माणूस आपल्या व्यवसायांत निपुण व यशस्वी आहे असें मानलें जातें. जो बिलकुल मेहनत न करतां अधिकांत अधिक कमाई करतो तो सर्वांत यशस्वी आणि भाग्यवान गणला जातो. भांडवलवादाची सुरुवात सौद्यापासून होते, आणि त्याची परिणति सट्टयांत होते. यालाच जुवा म्हणतात. म्हणून सौद्याच्या तत्त्वाची परिणति जुव्यांत होते. जिथें प्रत्येक जण कमींत कमी देऊं इच्छितो, आणि अधिकांत अधिक घेऊं इच्छितो, तिथें माणसां–माणसांमध्यें विश्वास कसा निर्माण होईल? म्हणून मनुष्याचा मनुष्यावरील अविश्वास, हा ज्या अर्थ–शास्त्राचा आधार आहे, तें अर्थ–शास्त्र नसून अनर्थ-शास्त्र आहे.

## अनिवार्य आंतर–विरोधाचें स्वार्थशास्त्र

सुरवातीला भांडवलदारी अर्थ-रचनेंत प्रत्येक व्यक्ति आपापला स्वार्थ पाहत असे. स्वार्थाच्या चढाओढींत कांहीं सीमा नव्हती. अनिर्बंधपणें

ही स्पर्धा चालू होती. कारण जर प्रत्येक जण आपला स्वार्थ साधेल तर त्यातून सर्वांच्या सामुदायिक स्वार्थाची सिद्धि होईल असें मानलें जात होतें. त्या काळांत उपयोगिता—वादाच्या नांवानें ज्या तत्त्वज्ञानाचा समाजांत प्रभाव वाढत होता, त्याचें अधिकांत अधिक लोकांचें अधिकांत अधिक भलें, हें लक्ष्य होतें. त्यासाठीं जर प्रत्येक जण आपलें भलें करण्याचा प्रयत्न करील तर त्यांतून सर्वांचें भलें होईल असें त्यांचें सूत्र होतें. या संपत्ति-विज्ञानाचें, फ्रेडरिक हॅरिसननें, 'स्वार्थ—शास्त्र' असें नांव ठेवलें. या तत्त्वज्ञानाच्या, साध्य आणि साधन, ह्या दोहोंतहि एक भयानक अपसिद्धान्त आहे. कारण जर प्रत्येक जण आपापली चिंता करूं लागला तर त्यांतून सर्वांचें हित सिद्ध होत नाहीं. व्यक्तिगत स्वार्थाच्या बेरजेनें अथवा गुणाकारानें समाजहिताची सिद्धि होत नाहीं. म्हणूनच भांडवलवादी अर्थ—व्यवस्थेंतून अनिवार्य अंतर्विरोध निर्माण झाला.

## 'शक्ति प्रमाणें काम आणि गरजे प्रमाणें दाम'

त्यानंतर, दलित मानवाचा प्रथम उद्धारकर्ता, गरिबांचा पहिला पैगंबर, कार्ल—मार्क्स याचा जन्म झाला. त्यानें एका नव्या सिद्धान्ताची स्थापना केली. 'कमींत कमी काम आणि जास्तींत जास्त दाम' हा भांडवल वादाचा सिद्धान्त होता. 'हा स्वार्थी आणि मतलबी मालदारांचा सिद्धान्त आहे' असें मार्क्सनें म्हटलें. आणि त्याऐवजीं 'जितकी ताकद तितकें काम आणि जितकी गरज तितकें दाम' असा दुसरा सिद्धान्त त्यानें मांडला. हा क्रान्तीच्या अर्थशास्त्राचा सिद्धान्त आहे. कोणताहि समाज-निष्ठ माणूस हा सिद्धान्त न कुरकुरतां मान्य करील.

## 'जितकी ताकत तितकें काम आणि कामाइतकें दाम'

पण हा सिद्धान्त अमलांत आणण्याचा प्रयत्न सुरू झाला तेव्हां एक फार मोठी अडचण निर्माण झाली. जर गरजेइतकें दाम मिळणारच असलें तर शक्तीइतकें काम कुणी कां म्हणून करील? असा प्रश्न निर्माण

झाला. या सिद्धान्तांत काम करण्याची कोणतीहि प्रेरणा नसल्यामुळें, आपण जरुरीपुरतें दाम देणार असाल तर आम्हीहि जरुरीइतकेंच काम करूं अशी वृत्ति निर्माण झाली. म्हणून रशियांत जेव्हां प्रत्यक्ष आर्थिक जीवनांत, समाजवादी सिद्धान्ताचा प्रयोग करण्याचा प्रयत्न सुरू झाला, तेव्हां स्टॅलिन-प्रणीत संविधानांत ( Stalin Constitution ) एका नव्या सिद्धान्ताचा अंतर्भाव करण्यांत आला. या सिद्धान्ताचा आशय असा आहे कीं 'जितकी ताकत तितकें काम आणि कामाइतकें दाम' ह्यांत आदर्श समाजवादी सिद्धान्ताचा त्यांना परित्याग करावा लागला हें यावरून उघड होतें. भांडवलवादाच्या सिद्धान्तांत केवळ व्यक्तिगत मुनाफ्याची भावना होती. सामाजिकता तिळमात्रहि नव्हती.

## भांडवलवादी 'प्रतिस्पर्धा' आणि समाजवादी 'परिस्पर्धा'

हा स्टॅलिन-प्रणीत सिद्धान्त भांडवलवादाच्या एक पाऊल पुढें आहे, पण त्यांत व्यक्तिगत कमाईची प्रेरणा शिल्लकच राहते. प्रत्येक मजुराचा एक प्रतिष्ठित व्यक्ति आणि श्रमवीर म्हणून सार्वजनिकरीत्या गौरव करणें अपुरें ठरलें. त्यांतून सामाजिक प्रेरणा निर्माण होऊं शकली नाहीं. त्यामुळें सामाजिक प्रेरणेऐवजीं व्यक्तिगत लाभाच्या प्रेरणेची योजना करावी लागली. कारण 'जितकें काम तितकें दाम' हें सहकाराचें सूत्र नसून प्रतिस्पर्धेचेंच सूत्र आहे. स्टॅलिननें त्याला 'समाजवादी परिस्पर्धा' (Socialist Emulation) म्हटलें आहे. भांडवलवादी प्रतिस्पर्धेत एक मजूर दुसऱ्याचा पाडाव करून किंवा दुसऱ्याला खालीं ओढून पुढें जातो, पण समाजवादी परिस्पर्धेत एक श्रमिक दुसऱ्याच्या पुढें तर जातो पण त्याचबरोबर इतरांना आपल्याबरोबर पुढें घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो. या समाजवादी परिस्पर्धेची स्टॅलिननें खालील व्याख्या केली आहे. 'एक माणूस चांगलें काम करीत नाहीं, दुसरा चांगलें काम करतो आणि तिसरा त्याहूनहि चांगलें काम करतो; म्हणून जो सगळ्यांत चांगलें काम करणारा आहे, त्याची बरोबरी करा आणि सर्वांच्या

योग्यतेचा दर्जा उंच करा.' या सामाजिक परिस्पर्धेचा स्टेखानॉव्ह आन्दोलनांत परिपाक झाला. या आन्दोलनामुळें रशियाचें उत्पादन फार वेगानें वाढलें असें म्हटलें जातें.

## क्रान्ति थांबली आहे

म्हणजे आजवरच्या क्रान्तीच्या प्रक्रियेंत श्रमाच्या प्रेरणेचा प्रश्न सोडविणें शक्य झालें नाहीं असा याचा अर्थ आहे. आजवर दुसऱ्या देशांत ज्या क्रान्त्या झाल्या त्या इथवर येऊन थांबल्या. क्रान्तीचें काम ह्यानंतर प्रतिगामी होऊं लागलें असें आजच म्हणणें कदाचित् श्रेयस्कर होणार नाहीं. पण ह्या मुक्कामावर पोंचल्यानंतर ती एक प्रकारें थांबली असें निश्चितपणें म्हणतां येतें.

## बिगार व मजुरी इमानदारीचे शत्रु आहेत

श्रमाची मुळींच प्रतिष्ठा नसणें हा भांडवलवादाचा फार मोठा दोष आहे. त्यांत आळसाची प्रतिष्ठा आहे. काम करणारा एक असतो आणि ज्याचें काम बनतें तो दुसराच असतो. केवळ दामासाठीं काम केलें जातें. दुसऱ्यासाठीं जें काम जबरदस्तीनें करविलें जातें त्याला बिगार म्हणतात. दामासाठीं जें काम केलें जातें त्याला मजुरी म्हणतात. दोहोंतहि मालक आणि मजूर असा भेद असतो. आणि म्हणून कामांत इमान नसतें. याचा उपाय असा आहे कीं जो काम करतो तोच मालक असला पाहिजे. असें झालें म्हणजे प्रत्येक माणूस आपलें काम प्रामाणिकपणानें आणि काळजीपूर्वक करील. जेव्हां उत्पादकच मालक बनतील तेव्हां आळसाची प्रतिष्ठा नाहींशी होईल आणि काम प्रामाणिकपणें होऊं लागेल.

## श्रमाच्या प्रेरणेचा प्रश्न सुटला नाहीं

परंतु यांतहि मालकीची प्रेरणा शिल्लकच राहते. सोव्हियट रशियांत आज दोन प्रकारची मालकी आहे व दोन प्रकारचे सामाजिक उत्पा-

दनाचे प्रयोग चालू आहेत. जिथें राज्याची मालकी आहे तिथें श्रमिकांना वेतन मिळतें. पण सोव्हियट किसानांना सामुदायिक शेतीच्या मिळकतींतून योगक्षेमाचें साधन मिळतें. याशिवाय त्यांच्या मालकीचीहि थोडीशी जमीन असते. तात्पर्य असें कीं, अजूनपर्यंत श्रमाच्या प्रेरणेची समस्या सोडविण्यांत आपल्याला यश मिळालें नाहीं.

## गांधीजी—एक पाऊल पुढें

गांधीजींनीं या दिशेनें आणखी एक पाऊल पुढें टाकलें आहे. केवळ उत्पादनाची मात्रा वाढवीत राहणें हें आमचें उद्दिष्ट नसलें पाहिजे. कारण फक्त उत्पादनासाठीं आपण परिश्रम करूं लागलों तर काम ही जीवनाची केवळ एक आवश्यकता आहे असें मानलें जाईल. त्यामुळें कामावांचून सर्वांना सुखाची सामुग्री मिळाविण्याची व्यवस्था होऊं शकली तर ती आर्थिक व्यवस्था आदर्श मानली जाईल. पण तिनें परिश्रमाची प्रतिष्ठा अथवा परिश्रमाची अभिरुची ह्यांचा विकास कदापि होणार नाहीं. म्हणून आमचें काम, आमची गरज न राहतां आमचें व्रत असलें पाहिजे, असें गांधींचें म्हणणें आहे. व्रतांत स्वेच्छेचा आणि पावित्र्याचा संयोग आहे. गांधीजींच्या एकादश व्रतांत शरीरश्रमाचा समावेश होतो. आजचा श्रमजीवि श्रमनिष्ठ नाही. त्याला लाचारीनें श्रम करावे लागतात, म्हणून श्रम टाळण्याची त्याची इच्छा आहे. आपल्याला मुळींच काम करावें लागणार नाहीं, कामांतून कायमची सुटी मिळेल, आणि आराम आणि आरामच मिळण्याचा अधिकार प्राप्त होईल, त्या दिवसाची तो एकसारखी वाट पाहत आहे.

## श्रमाचें व्रत व कामांत आनंद

म्हणून मनुष्यांत जोंवर श्रमनिष्ठा निर्माण होणार नाहीं, तोंवर उत्पादन हें सामाजिक मूल्य बनणार नाहीं. माणसाला जोंवर कामाची आवड वाटणार नाहीं आणि काम हें आपलें व्रत आहे असें तो मानणार

नाहीं तोंवर परिश्रम हें देखील सामाजिक मूल्य ठरणार नाहीं. आणि असें झालें तर उत्पादक परिश्रमाच्या प्रेरणेसाठीं अवान्तर हेतु सतत शोधावे लागतील. ह्या सर्व प्रश्नांचें एकमेव उत्तर गांधीजींच्या प्रक्रियेंत आहे.

## श्रमयज्ञाचें प्रयोजन

भूदान-यज्ञ-आन्दोलनाच्या प्रक्रियेंत विनोबांनीं या दोन्ही प्रेरणांचा अतिशय कुशलतेनें मेळ केला आहे. भूदान-यज्ञाच्या प्रक्रियेंत उत्पादकाला उत्पादनाच्या साधनांचा मालक बनविण्याची योजना आहे. त्यामुळें काम करण्याची आवड निर्माण होते. मालकीच्या भावनेचें निराकरण करण्यासाठीं विनोबांनीं लहान लहान मालकांकडून दान घेण्याची योजना आपल्या प्रक्रियेंत केली आहे आणि मालकीच्या विसर्जनानंतरहि परिश्रमाची प्रतिष्ठा आणि अभिरुची कायम ठेवण्यासाठीं श्रम-यज्ञाची योजना केली आहे. अशा तऱ्हेनें आज क्रान्ति ज्या मुक्कामावर येऊन कुंठित झालेली होती, त्याच्या पुढें एक पाऊल उचलण्याची योजना भूदान-यज्ञ आन्दोलनाच्या प्रक्रियेंत आहे.

## मानवीय अर्थशास्त्राचें मूलग्राही सूत्र

या मानवीय अर्थशास्त्राचें, ‘ कामाची शक्ति वाढवीत चला आणि दामाची आवश्यकता कमी कमी करा ’ असें सूत्र आहे ‘ कमींत कमी काम आणि अधिकांत अधिक दाम ’ असें भांडवलवादी सूत्र आहे. ‘ जितकी ताकत तितकें काम आणि जितकी जरुरत तितकें दाम ’ असें समाजवादाचें वैज्ञानिक सूत्र आहे; आणि ‘ जितकी ताकत तितकें काम व जितकें आणि जसें काम, तितकें दाम ’ असें त्या रशियन आर्थिक नीतीचें सूत्र आहे. परन्तु भूदान-यज्ञ-आन्दोलन या समस्येच्या मुळाशीं पोंचत असल्यानें त्याचें सूत्र मूलग्राही आहे. तें कामाविषयींची हौस व पावित्र्याची भावना निर्माण करतें. म्हणून या मानव-निष्ठ क्रान्तीचा ‘ श्रम आमचें व्रत, आणि संयम आमचें शील ’ असा सिद्धान्त आहे.

अर्थशास्त्राच्या भाषेंत 'कामाचें कौशल्य वाढवीत चला आणि दामाची गरज कमी करीत चला' असा याचा अनुवाद होईल.

## सारी पृथ्वी एक विशाल रण-क्षेत्र

उद्योग आणि कला, तसेंच परिश्रम आणि कारागिरी यांत जें अंतर आहे तें नाहींसें करण्याचा प्रयत्न हा या जगांतील एक प्रमुख सांस्कृतिक प्रश्न आहे. यंत्रयुगाचा ज्या देशांत प्रभाव होता, तेथील उत्पादन तर वाढलें परंतु त्यांतून मनुष्याचें काय करावें ? अशी नवी समस्या निर्माण झाली. युद्धामध्येंहि यंत्रीकरण द्रुत गतीनें वाढत आहे. त्यामुळें त्यांत मनुष्याच्या शौर्याला मुळींच अवकाश राहिला नाहीं. कारण एक सुकुमार मुलगी देखील अणु-बॉंब टाकूं शकते. लहान मुलें, म्हातारे, आजारी सारे निरन्तर रण-क्षेत्रांत बसल्यासारखे आहेत; कारण ही सारी पृथ्वीच एक विशाल रण-क्षेत्र बनली आहे. म्हणून ज्या दिवशीं अणु-बॉंबचा स्फोट होईल त्या दिवशीं आम्ही सारे रणभूमींत नष्ट होऊन वीर-गति प्राप्त करूं.

## निरुपयोगी हात म्हणजे हुकुमशाहीला आमंत्रण

उत्पादनांतहि यंत्रीकरण झपाट्यानें वाढत आहे. त्यामुळें मनुष्याच्या हाताचा उपयोगच उरला नाहीं. जर मनुष्याच्या हाताचा उत्पादनासाठीं अथवा युद्धासाठीं उपयोग होणार नाहीं तर त्याच्या हातांतील कौशल्य कमी होत जाईल. आणि त्यामुळें समाजांतील लक्ष्मी अंतर्धान पावेल. लक्ष्मी, सावकारांच्या तिजोरींत, बॅंकांच्या हुंडींत आणि सोन्याच्या विटांत नसते. मनुष्याच्या बोटांच्या कुशलतेंत तिचा निवास असतो. जर मनुष्याच्या हाताचा युद्ध-कलेंत अथवा उद्योगांत उपयोग झाला नाहीं, तर ते खरोखरच बेकार होतील. अशा स्थितींत कला जीवनापासून विमुख होते, आणि तिचा वस्तुस्थितीशीं कसलाहि अनुबन्ध राहत नाहीं. मनुष्याचे हात अशा तऱ्हेनें बेकार झाले कीं त्यांचा दोन्ही हात जोडून

कुणासमोर नतमस्तक होणें हा एकमेव तिसरा उपयोग शिल्लक उरतो. अशी अवस्था येते तेव्हां लोकशाहीचा अन्त होऊन हुकुमशाहीस सुरुवात होते.

## यंत्र जगेल, मनुष्य मरेल

जर उत्पादक उद्योगांसाठीं मनुष्याच्या हातांचा आपण उपयोग केला नाहीं तर हळूं हळूं त्या हातांचें वैशिष्टयच नाहींसें होईल. कारण उपकरणाच्या बहुलतेनें कलेचा ऱ्हास होतो. उपकरण जितकें कुशल असेल तितका मनुष्य अकुशल होईल. जेव्हांपासून टाईपरायटर आला तेव्हांपासून हस्ताक्षराच्या कलेचा लोप झाला. असेंच सर्व कलांच्या बाबतींत होईल. यंत्र जगेल आणि मनुष्य क्षीण होत जाईल. म्हणून मनुष्याच्या व्यक्तित्वाच्या विकासासाठीं आणि मानवीय मूल्यांच्या संरक्षणासाठीं मनुष्याच्या शक्तीचा आणि त्याच्या कलेचा उत्पादन-कार्यांत संपूर्ण उपयोग झाला पाहिजे. त्याचप्रमाणें मनुष्य-सहकारी पशूंच्या शक्तीचाहि उत्पादन-कार्यांत संपूर्ण उपयोग झाला पाहिजे. ज्या दिवशीं मनुष्यानें मनुष्येतर प्राण्यांना आपल्या सामाजिक जीवनांत सहायक म्हणून दाखल करून घेतलें त्या दिवशीं त्यानें एक अपूर्व सांस्कृतिक पाऊल उचललें. मनुष्य-शक्ति आणि पशु-शक्तीच्या पूर्ण विकासाला जर अवसर मिळाला तरच यंत्र मनुष्याला जगवील, नाहींतर तें मनुष्याची जागा घेऊन त्याचा संहार करणारा राक्षस ठरेल!

## जो काम करील तोच खाईल

भूदान-यज्ञ आन्दोलनांत या सर्व प्रश्नांचा विचार केला आहे. म्हणूनच जो खातो त्यानें काम केलेंच पाहिजे, असा विनोबांचा आग्रह आहे. ज्याला उपभोग घ्यावयाचा आहे, त्यानें उत्पादक परिश्रमांत भाग घेतलाच पाहिजे. आर्थिक विषमतेच्या निराकरणासाठीं विनोबांनीं चार गोष्टी अत्यावश्यक मानल्या आहेत.

( १ ) सौद्याचें तत्त्व नष्ट झालें पाहिजे. उत्पादन उपयोगासाठीं झालें पाहिजे; मुनाफ्यासाठीं नव्हे.

( २ ) व्यक्तींच्या धंद्यांतील पारस्पारिक विरोध नष्ट झाला पाहिजे. एकाची गरज ही दुसऱ्यासाठीं लाभ घेण्याची संधि बनली न पाहिजे.

( ३ ) उत्पादनांत मनुष्य आणि पशु यांच्या श्रमाचा आणि कलेचा संपूर्ण उपयोग झाला पाहिजे.

( ४ ) उत्पादक परिश्रमाविषयीं आनंदाचा आणि पावित्र्याचा प्रत्यय आला पाहिजे.

## सशस्त्र क्रान्ति म्हणजे नृशंसता

सारें जग आज क्रान्तीच्या अशा प्रक्रियेच्या शोधांत आहे कीं जीमुळें मानवी हृदयांचेंच नव्हे तर बुद्धीचेंहि ऐक्य घडून येईल. माणूस आपल्या मेंदूचा उपयोग दुसऱ्याच्या मेंदूचा पराभव करण्यासाठीं करणार नाहीं; तर दोघेहि हृदय आणि बुद्धीच्या मीलनानें एकमेकांचें जीवन बनवितील. माणूस दुसऱ्या माणसाचा विचार नष्ट करण्यासाठीं आपल्या संपूर्ण बुद्धीचा उपयोग करील तर जगांतून विचाराची सत्ताच नाहींशी होईल. दुसऱ्याच्या विचाराची ज्याला भीति वाटते तो विवेकभ्रष्ट होतो आणि त्याच्या तर्काचा च्छेद करण्याऐवजीं त्याच्या शिराचाच च्छेद करूं लागतो. पण शिरच्छेद केल्यानें विचार नष्ट होत नाहीं ही साधी गोष्ट त्याच्या लक्षांत येत नाहीं. दुसऱ्याचें डोकें उडवून, स्वतःच्या डोक्यापेक्षां इतरांच्या डोक्यांची त्याला अधिक कदर आहे हें तो सिद्ध करीत असतो. पण अशुद्ध विचाराचें शुद्ध विचारानेंच निराकरण होतें. म्हणून सशस्त्र क्रान्ति ही खरोखर क्रान्तिच नव्हे. तें तर नृशंसतेचें तांडव आहे.

## नेहरू सरकारचें मर्मस्थान

हिंदुस्थानांत अलीकडे, युरोप, अमेरिका अथवा चीनमधून जितके दीर्घदर्शी विचारक आले, त्या सर्वांनीं वर्तमान नेहरू सरकारचें मर्मस्थान

त्यांची भूमि वितरण नीति आहे, असें एकमुखानें सांगितलें. आशिया खंडांत क्रान्तीचा एकमेव मार्ग खेड्यांतूनच असूं शकतो अशा निर्णयावर चीनमध्यें माओ आला. कारण ज्या ठिकाणीं अन्न निर्माण होतें, ज्या ठिकाणीं अधिकांश लोक राहत असतात व ज्या ठिकाणीं अन्याय अत्यंत तीव्र रूपांत चालत असतो, अशा ठिकाणींच शक्तीचें खरेंखुरें अंतिम अधिष्ठान असतें. पण ही गोष्ट चँग-कै-शेकच्या ध्यानांत आली नाहीं. त्याला इतक्या दूरचें दिसलें नाहीं. पण नंतर त्यानेंहि फोर्मोसांत अधिकांत अधिक जमीन १० एकर बाळगण्याची कमाल मर्यादा ठरवून टाकली, आणि कसेल त्याच्याच जवळ जमीन राहील असे कायदे केले, पण हें सारे वेळ निघून गेल्यानंतर केलें.

## तेलंगणाचा दाखला

कृषिप्रधान देशांतील किसानाला, कोणत्याहि 'वादाचें' अथवा शासन प्रणालीचें आकर्षण नसतें. त्याला तर जमीन हवी असते. मागील निवडणूक हा आमच्या देशांतील याचा ताजा पुरावा आहे. ज्यांच्याजवळ जमीन नव्हती त्यांना जमीन देण्याची सुरवात सर्वांत आधीं साम्यवादी पक्षानें तेलंगणांत केली. त्यामुळें त्या पक्षाला जी लोकप्रियता मिळाली ती सरकारच्या सैन्यानें आणि शस्त्रास्त्रानेंहि नष्ट होऊं शकली नाहीं. तेलंगणांतील साम्यवादी पुढारी श्री. नारायण रेड्डी, यांची प्रचंड बहुमतानें झालेली निवडणूक हें याचें प्रत्यक्ष प्रमाण आहे. त्यांच्या विभागांतील ७५ टक्के मतदात्यांनीं मतदान केलें आणि श्री. नारायण रेड्डी यांना जितकीं मतें मिळालीं, तितकीं साऱ्या भारतांत कोणत्याहि एका उमेदवाराला मिळालीं नाहींत.

## लोकशाही मार्फत भूमि सुधार

लोकशाही पद्धतीनें साऱ्या आशियांतील कोणत्याहि देशांत मूलगामी भूमि सुधारणा झाली नाहीं हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. कोणत्याहि

लोकनिर्वाचित विधान सभेची असे कायदे करण्याची हिंमत झाली नाहीं. जपानांत मॅकऑर्थरनें आपल्या लेखणीच्या एका फटकाऱ्यानें भूमि-सुधारणा घडवून आणली. फोर्मोसांत जी जमीन किसानांना मिळाली ती प्रथम जपानी जमीनदारांच्या मालकीची होती. खरोखर आपण त्याला जमिनीचें पुनर्वितरण म्हणूं शकत नाहीं. रशियाप्रमाणें चीनचें उदाहरणहि मशहूर आहे. तिथें शेतकऱ्यांनीं भूमि सुधारणे साठीं लाथांच्या आणि बंदुकीच्या धाकानें मत दिलें. आधुनिक समाजांत संपूर्ण लोकशाही पद्धतीनें मोठ्या प्रमाणावर भूमि सुधारणा, फक्त झेकोस्लोव्हाकियांत, १९२६ सालीं करण्यांत आल्या, असें आधुनिक इतिहासवेत्त्यांचें मत आहे. पण आज भारतांतील प्रत्येक पक्ष लोकशाहीच्या द्वारां भूमीचें पुनर्वितरण करूं इच्छित आहे. म्हणून आशियांत लोकशाहीचें मूळ मजबूत करावयाचें असेल तर जमिनीची भूक भागविण्याचें सर्वांत पहिलें आणि अत्यावश्यक पाऊल आपल्याला उचलावें लागेल.

## ‘ माझीच ! ही माती आतां माझीच आहे ’

नुकतीच बुडापेस्टच्या दक्षिणेकडील हंगेरी देशाची एक गोष्ट वाचनांत आली. तिथें कम्युनिस्ट क्रान्ति नंतर जमिनीचें वितरण झालें. ज्या भूमिहीनांना जमीन मिळाली त्यांच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. ते किसान हातांत माती घेऊन तिच्याकडे एकसारखे टक लावून पाहत होते असें त्या लेखकानें लिहिलें आहे. एक म्हातारा हंगेरियन शेतकरी तर ‘ आतां ही माती माझी आहे, जमीनदार आतां खरोखरच नष्ट झाले.’ असें आपल्याशींच वेड्यासारखा बडबडत होता,

## साम्यवाद्यांचा पराभव करूं शकणार नाहीं

मलाया–राज्य–संघाच्या फौजी शासनाचा मुख्य अधिकारी, ब्रिटिश जनरल, सर जिराल्ड टेम्लर गनिमी काव्यानें लढणाऱ्या साम्यवाद्यांचा सामना करीत होता. तो म्हणाला मला आपण अधिक शंभर पलटणी

दिल्या तरी, आवश्यक भूमि—सुधारणा—कायद्यावांचून मला साम्यवाद्यांचा पराभव करतां घेणार नाहीं.' त्याचें म्हणणें अतिशय मार्मिक आहे. तो पुन्हां म्हणतो, 'माझ्या कामापैकीं फक्त १० टक्के काम फौजेशीं संबंधित आहे आणि बाकीचें ९० टक्के काम राजकीय आणि आर्थिक आहे.'

## एका नव्या प्रकरणाचा श्रीगणेशा

दुसऱ्या देशांतील हे अनुभव आम्हांला जितके सावध करणारे आहेत तितकेच पुरुषार्थाला प्रेरणा देणारे आहेत. मनुष्याचा संहार आणि संपत्तीचा विध्वंस केल्यावांचून गरीब व अमीर, मालक व उत्पादक यांच्या संमिलित पुरुषार्थानें जर आपण आपल्या देशांतील भूमि-समस्या सोडवूं शकलों, तर साऱ्या जगांत लोक-सत्तेची चिरकालिक प्राणप्रतिष्ठा झाल्यावांचून राहणार नाहीं. सारे वाद आणि सत्ता-वादी पक्ष यांपेक्षां मनुष्य श्रेष्ठ ठरेल व मानवीय इतिहासांत एका उज्ज्वल आणि स्फूर्तिदायक प्रकरणाचा 'श्रीगणेशा' होईल. भूदान-यज्ञ-आंदोलन या नव्या प्रकरणाचें पुण्याहवाचन करीत आहे.

# पोट फेकून देण्याचा पुरुषार्थ

भुकेलेला जसा भिकारी व चोर बनतो तसाच क्रान्तिकारीहि बनूं शकतो. भुकेंत उपवासाची शक्ति भरली कीं भुकेंतून क्रान्ति होते. याचें एक अद्‌भुत उदाहरण 'सत्त्वपरीक्षा' या नाटकांत आहे. लोकमान्य टिळक व गांधीजी यांचे एक सुप्रसिद्ध अनुयायी, केसरीचे दीर्घ कालपर्यंत संपादक आणि 'नवाकाळ'चे संस्थापक, स्वर्गीय कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनीं हरिश्चंद्राच्या चारित्र्यावर हें नाटक लिहिलें आहे. आपल्या नाटकांच्या द्वारें आपल्या काळांतील उपयुक्त व तेजस्वी राजकीय आदर्शांचें प्रतिपादन करणें हें खाडिलकरांचें वैशिष्ट्य आहे. त्यासाठीं त्यांनीं जरूर तेथें मूळ कथानकांत थोडें परिवर्तनहि केलें आहे. खालील अविस्मरणीय प्रसंग त्यांच्याच 'सत्त्व परीक्षा' नाटकांतील आहे.

हरिश्चंद्र श्वपच चांडालाकडे नोकरीस राहतो. त्याच्या मोबदल्यांत डोम त्याला दोन भाकरी होतील एवढेंच पीठ देतो. हरिश्चंद्राची धर्म-पत्नी तारामति आणि मुलगा रोहिदासहि याच दोन भाकरीवर जगतात. एक सगळी भाकर रोहिदासाला देऊन टाकतात आणि उरलेली एक हरिश्चंद्र—तारामति असे दोघे मिळून खातात.

एक दिवस हरिश्चंद्र घरीं येऊन भरलेल्या कंठानें म्हणतो, 'तारामति, आज मी पिठाचा अखेरचा हप्ता घेऊन आलों आहे. मी दिवसभर मजुरी करीत नसल्यानें मालकाच्या पिठाचे माझ्याकडे कर्ज होत गेलें. आज त्यानें शेवटचा हप्ता देऊन टाकला आहे. आतां मला उपाशी राहून काम करावें लागेल.'

'तारामति! मी जाणून बुजून हें असिधारा व्रत स्वीकारलें आहे. त्याचे काय परिणाम होतील, हें मला ठाऊक होतें, त्यामुळें माझा कांहीं

उजर नाहीं. माझी कांहीं तक्रार नाहीं. मला तुझी देखील फार काळजी वाटत नाहीं. पवित्र विवाह-संस्काराद्वारें तूं स्वतः माझी होण्याचें दुःसाहस केलें आहेस. तेव्हां त्याचें कटुफल तुला भोगावेंच लागणार आहे. पण मला या सुकुमार लहानग्या रोहिदासाची फार चिंता वाटते. भुकेनें त्याचा चेहरा जेव्हां मलूल होईल, त्याच्या डोळ्यांतील ज्योति मंद होत आहे असें दिसेल, त्याचा बोल क्षीण होत जाईल, तेव्हां तारामति ! मला माझा तोल सांभाळतां येणार नाहीं—माझा स्वतःवर ताबा राहणार नाहीं. कुणास माहीत, माझी हिंमतहि खचून जाईल ! मी माझें व तुझें दुःख हसत हसत सहन करूं शकतों. परंतु जेव्हां या रोहिदासाचें मुख-कमल कोमेजून जाईल तेव्हां 'भगवन्तानेंच रक्षण करावें.'

रोहिदास हा सारा संवाद लक्षपूर्वक ऐकत होता. त्याचा चेहरा एकाएकीं उजळला. डोळे एका नव्या तेजानें चमकूं लागले आणि तो आपल्या कोमल स्वरांत म्हणाला,

'महाराज, असें कधींच होणार नाहीं. आपली प्रतिज्ञा-पूर्ति व सत्य-निष्ठा यांत बाधक होणारें हें पोट या क्षणीं फेकून देतों.'

असें म्हणून रोहिदास आपल्या हातांत असलेला भाकरीचा तुकडा फेकून देतो. हरिश्चंद्र गद्‌गद होऊन त्याला मिठी मारतो. तारामति पटापट त्याचे मुके घेऊं लागते.

हा प्रसंग नाटकांत पाहिल्यापासून माझ्या हृदयावर कायमचा अंकित झाला आहे. आपल्या देशांतील नवयुवकांसमोर खाडिलकरांनीं एक उच्च आदर्श मांडला आहे. आज सुशिक्षित देखील बेकार आहेत. साऱ्यांनाच पुरेसें खायला मिळत नाहीं. मोठमोठ्या व्यक्तींचें व्यक्तित्व चोळामोळा होत आहे. अशा कठिण प्रसंगीं आपलें पोट मानवनिष्ठ कान्तींत विघ्नरूप न होऊं देण्याचा संकल्प करण्याइतकी संकल्पशक्ति परम दयाळू परमेश्वरानें आपल्याला दिली तर जन-क्रान्तीचें यश

८२००

निश्चित आहे. ज्यांत दुसऱ्याचें शोषण होतें, अथवा जे स्वभावतः अनुत्पादक किंवा समाजविरोधी आहेत असे व्यवसाय, या देशाचा नागरिक कां म्हणून करील? भुकेंत उपवासाची शक्ति निर्माण होईल व जमान्याचें —काळाचें—स्वरूप बदलून जाईल.

• • •

— २ —

## एकाच्या मृत्यूंत दुसऱ्याचें जीवन!

आज सगळीकडे भांडवलवादाचें साम्राज्य आहे. त्यामुळें एकाचा मृत्यु हेंच दुसऱ्याचें जीवन आहे. भांडवलवादाच्या आन्तर्विरोधाचें हें आत्यन्तिक स्वरूप आहे. आपल्या रोजच्या जीवनांत याचीं कित्येक उदाहरणें सांपडतात.

एका शहरांत एक विचित्र दुकान होतें. 'प्रेतयात्रेच्या सामानाचें दुकान' अशी पाटी त्या दुकानावर लावली होती. दुकानच्या मालकाशीं माझी थोडीशी ओळख होती. एक दिवस अचानक भेट झाली तेव्हां तो म्हणाला, 'उद्यां माझ्या घरीं सत्यनारायणाची पूजा आहे, जरूर या' मीं विचारलें, 'तुमच्या इथें पूजा कसची!' तो म्हणाला, 'मुलगा पास झाला आहे आणि भगवन्ताच्या कृपेनें त्याला शिकवायला भरपूर आमदनी झाली आहे.' माझ्या तोंडांतून अभावितपणें खालील शब्द निघाले.

'याचा तर अर्थ असा आहे कीं शहरांतील अधिक माणसें मेलीं. मग हें आमंत्रण सत्यनारायणाच्या प्रसादासाठीं आहे कीं मृतकांची खिचडी खाण्यासाठीं?'

मी फटकळपणें बोललों, पण तें त्याच्या हृदयाला जाऊन भिडलें.

तो म्हणाला, 'आपलें म्हणणें फार बोंचतें; पण हें काय मला एकट्यालाच लागूं आहे? साऱ्या समाजाचा व्यवहार काय याच न्यायावर नाहीं चालत?'

मी म्हणालों 'मला देखील त्याचीच आठवण करून द्यायची होती.'

• • •

— ३ —

## जगाच्या आकाराचा माणूस

आज सारें जग जवळ येत असल्यानें 'सारें विश्व एक आहे' हा आदर्श सिद्ध होऊन राहिला आहे असें वाटतें. प्रत्येक प्रश्नाचा जागतिक संदर्भांत विचार करावा लागतो. यालाच प्रश्नाचें विश्वरूप दर्शन म्हणतात. त्यासाठीं भव्य भावना व व्यापक दर्शनाची आवश्यकता आहे. चांगला माणूस हाच चांगल्या जगाचा आधार आहे हें आपल्याला विसरतां येणार नाहीं. जेव्हां मनुष्याच्या भावना आणि बुद्धीला जगांतील व मानवांतील विश्वरूपाचें दर्शन होईल तेव्हां अशा मानवाचा उदय होईल कीं ज्याचें व्यक्तिमत्त्व क्षितिजाइतकें व्यापक असेल व जो विश्वात्म्याचें वास्तविक व्यक्त स्वरूप असेल. माणसाबरोबर जगाचा नकाशाहि बदलत जाईल. युगाची दिशा, माणसाची प्रकृति व समाजाचें रूप एकाच वेळीं बदलण्याचा विनोबांचा प्रयोग आहे.

लहानपणची गोष्ट आहे. आमचे शिक्षक एक विचित्र खेळ शिकवीत होते. त्यामुळें भूगोलाचें ज्ञान वाढत होतें व स्मरणशक्तीची परीक्षा होत होती.

शिक्षक पुठ्याच्या तुकड्यांचा बनविलेला एक जगाचा नकाशा नीट जुळवून आम्हांला दाखवीत असत. मुलांना तो नकाशा लक्षपूर्वक पाहण्यासाठीं सांगत. त्यानंतर पुठ्याचे तुकडे विस्कळित करून पत्ते

खेळण्यापूर्वी आपण जसा पत्त्यांचा ढीग करून ठेवतों, तसा या तुकड्यांचा ढीग करून ठेवीत, आणि मग मुलांना नकाशा जुळवायला सांगत. मुलें चुका करीत. कुणी कामश्चाटकाच्या जागीं मादागास्करचा तुकडा ठेवून देत, तर कुणी ऑस्ट्रेलियाचा तुकडा आफ्रिकेच्या उत्तरेला ठेवीत. एखादा मुलगा फार हुशार व तीक्ष्ण बुद्धीचा निघे. जसे गांधीजी किंवा विनोबा. अशाच एका मुलानें एक तुकडा उलटवून पाहिला. त्यावर माणसाच्या आकृतीचा एक अवयव त्याला दिसला. पुठ्ठयांच्या एका बाजूला जगाच्या नकाशाचे भाग आहेत व दुसऱ्या बाजूला माणसाच्या आकृतीचे निरनिराळे अवयव आहेत हें त्यानें तेव्हांच ताडलें. त्यानें सारे तुकडे उलटे केले आणि माणूस जमविण्याचा उद्योग सुरू केला. एका बाजूला माणूस जमला व दुसऱ्या बाजूला जग आपोआप जमलें.

यालाच मानवनिष्ठ क्रान्तीची प्रक्रिया म्हणतात.

अनुक्रम
विभाग
क्रमांक

— ४ —

## जीवन–निर्वाहाचें विज्ञान

केवळ पोथी–पंडित अभ्यासंजड असतो. त्याला अक्षरांशीं काम असतें, पण अर्थाविषयीं मुळींच आस्था नसते. म्हणूनच नेहमीं फार मोठे विदग्ध विद्वान् व तत्त्ववेत्ते जीवनांत बिलकुल नालायक ठरतात. फक्त प्रचंड शब्दांच्या आतषबाजीनें अशिक्षित लोकांना चकित करूं पाहतात. अशा तत्त्ववाद्यांचें कुणीतरी विडंबन केलें आहे. ‘जें सर्वांना ठाऊक आहे, तें पंडितांनाहि सहजासहजीं कळणार नाहीं इतक्या दुर्बोध भाषेंत लिहूं शकतो तो दार्शनिक होय.’

भारतांतील सर्वसाधारण लोक निरक्षर असल्यानें अयोग्य आहेत असें नेहमीं म्हटलें जातें. अमेरिकेचे भूतपूर्व परराष्ट्रीय वकील श्री.

चेस्टर बाऊल्स यांनीं ' एका परराष्ट्रीय वकिलाचा अहवाल ' या नांवाचें एक पुस्तक नुकतेंच लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं एका मार्मिक गोष्टीचा उल्लेख केला आहे. श्री. बाऊल्स म्हणतात—

' भारतांतील सर्वसाधारण लोक अशिक्षित असल्यामुळें अज्ञानी व मूर्ख असतील असा माझा समज होता. परंतु इथें आल्यानंतर हे लोक व्यवहार-ज्ञान व जीवन—कलेंत बऱ्याच सुशिक्षित माणसांपेक्षां मुळींच कमी दर्जाचे नाहींत असें मला आढळून आलें.'

एक मशहूर गोष्ट आहे. एक पंडित नावेंत बसून नदी पार करीत होते. वेळ घालविण्याकरितां त्यांनीं नावाड्याशीं गप्पा करायला सुरवात केली. पंडित म्हणाले, ' कांहीं लिहिणें वाचणें येतें ? रामायण वाचतां येतें कीं नाहीं ? '

नावाडी म्हणाला " कसचें येणार महाराज ! आम्ही तर खेड्यांतले मूर्ख लोक. काळे अक्षर नि म्हैस आम्हांला सारखीच ! आम्ही तर अक्षरशत्रु. "

पंडित म्हणाले, ' शिव शिव ! फारच दयनीय स्थिति आहे. तुमचें सारें जीवन फुकट गेलें. '

थोड्या वेळानें जोराचें वादळ आलें. नाव डोलायला लागली. पंडितजी घाबरले. त्यांची भयभीत मुद्रा पाहून नावाडी म्हणाला,

' ब्राह्मण महाराज ! पोहणें येत नाहीं काय ? '

पंडित म्हणाले ' अरे, रामाचें नांव घ्या ! कधीं असा प्रसंगच आला नाहीं. '

नावाडी म्हणाला, ' अरेरे ! आपली स्थिति पाहून फार वाईट वाटतें. इतकें सारें शिकलांत पण जीव वांचविण्याची कला शिकायला विसरलांत ! असें शिक्षण काय कामाचें ! तुमच्यापेक्षां तर आम्ही चांगले. निदान आम्हांला जीव वांचविणें तरी ठाऊक आहे.'

भारतांतील शिकला सवरला माणूस, जीवनांतील प्रश्नाकडे वर्तमानपत्रांत येणाऱ्या शब्दकोड्यांच्या स्वरूपांत पाहतो. त्यामुळें त्याचें ज्ञान व विज्ञान वस्तु–विमुख व जीवन–विमुख असतें.

• • •

— ५ —

## कल्पवृक्षाचें भूत

एक दिवस एक प्रवासी चालतां चालतां एका झाडाखालीं विश्रांति घेण्यासाठीं बसला. दैवयोगानें ज्या झाडाखालीं तो बसला होता तें कल्पवृक्षाचें झाड होतें. उन्हाळ्याचे दिवस होते. तहानेनें गळा सुकून गेला होता. पोटांत भुकेमुळें कावळे ओरडत होते. प्रवासी विचार करूं लागला—

'जर थंड पाणी मिळालें तर काय बहार होईल!' मनांत यायचाच अवकाश होता. लगेच एक नोकर चांदीच्या झारींत बर्फासारखें थंड पाणी घेऊन हजर झाला. प्रवाशानें पोटभर पाणी पिऊन घेतलें, मग पुन्हां विचार करूं लागला—'दोन चार पोळीचे घास मिळतील तर काय मजा होईल!' लगेच नाना प्रकारच्या पक्वान्नांनीं व मेवामिठाईनें भरलेलें सुशोभित ताट त्याच्या समोर आलें. 'आतां थोडीशी झोंप घ्यावी.' लगेच एक पलंग, नरम गादी, पंखा वारायला दासी हजर झाल्या. जेव्हां सर्व इच्छा अशा तऱ्हेनें पूर्ण व्हायला लागल्या तेव्हां त्याला संशय आला. 'कांहीं भूत–पिशाच्च तर नसेल ना?' असें त्याच्या मनांत आल्याबरोबर भूत समोर उभें झालें. 'अरे बापरे! हें मला खाऊन तर टाकणार नाहीं!' असें म्हटल्याबरोबर प्रवाशाची यात्रा तिथेंच संपली.

कल्पवृक्षवाद्यांसाठीं या गोष्टींत अनमोल शिक्षण भरलेलें आहे. ज्या जगांत विनाश्रमानें जीवनाच्या साऱ्या गरजा पूर्ण होतील, त्या जगांत

एक भूत सदासर्वकाळ आऽऽ वासून आमच्या छातीवर उभें राहील. जो अनेक प्रकारच्या सिद्धियोगांच्या चक्रांत सांपडतो त्याला ठावठिकाण राहत नाहीं असें आमच्या शास्त्रांतहि लिहिलें आहे. जो सिद्धि मिळविण्याची खटपट करीत नाहीं तोच आपल्या पुरुषार्थानें मुक्ति म्हणजे परम्–सिद्धि प्राप्त करून घेतो. जर जीवनांत आपल्याला पुरुषार्थ व पराक्रम दाखल करायचा असेल, व्यक्तीला स्वतंत्र व स्वावलंबी बनवायचें असेल, माणसाच्या शरिराचें सौंदर्य व उपयोगिता वाढवायची असेल, तर आपल्याला 'कल्पवृक्षाच्या' प्रतिष्ठेऐवजीं 'श्रमाची प्रतिष्ठा' वाढविली पाहिजे. कांहीं थोड्या लोकांनीं चैनीची वांसरी वाजवावी व इतरांनीं जीव घेऊं मर मर मेहनत करीत मरावें हें तर सर्वस्वीं असह्यच आहे. परन्तु सारे विजेच्या बटनाच्या भरंवशावर जगावेत हें देखील वांछनीय नाहीं. कारण तें माणसाच्या इतमामाला साजेसें नाहीं. म्हणूनच गांधीजींच्या योजनेंत 'शारीरश्रम' हें एक व्रत आहे. हा संसार म्हणजे नुसतें 'शयनागार' नाहीं, तर तें आमुचें 'कार्यक्षेत्र' अथवा 'तपोभूमि'हि आहे.

• • •

८२००
अनुक्रम १८८
विभाग
क्रमांक ९०९२
नों. दि. २९।१२।५४
REFBK-0008200